श्री

दसऱ्याचें सोनें

अथवा

विलायतेची सफर.

भाग पहिला.

जोतीराव भास्कर खासगीवाले.

सन १८९९

हें पुस्तक
बडोदें येथें फत्तेसिंग छापखाना
व
अमदाबाद येथील हिंदुस्थान प्रेसांत
छापिलें.

श्री

श्रीमत सरकार महाराज

सयाजीराव गायकवाड

सेनाखासखेल समशेर बहादुर

जी. सी. एस्. आय्.

इ० इ० इ०

यांस

हें अल्प प्रवासवृत्त

त्यांच्या

पिढीजादे सेवकानें प्रेमपुरस्सर व

परम-आदरानें

अर्पण

केलें आहे.

प्रस्तावना.

लहानपणापासून विलायत हा शद्ब किती तरी लोकांचे कानावरून गेला असेल! परंतु पहिले प्रथम विलायत या शद्बापासून एक प्रकारचा उद्वेग होत असे; परंतु अलिकडे या दोन देशांतील वळण वाढल्यामुळें व समाजाचीं मनें सुशिक्षित झाल्याकारणानें, तो परका वाटत नाहीं. सांप्रतकाळीं इतर देशांपासून आपण पुष्कळ गोष्टी घेण्यासारख्या आहेत, ही गोष्ट पहिल्या प्रथम ज्याचे लक्षांत येऊन तदनुसार स्वतः ज्या महात्म्यानें प्रयत्न सुरू केले, त्याचे खरोखरच आपले देशावर अनंत उपकार आहेत. आपले सर्व प्रजाजनांचे पितृवत् पालक व शास्ते श्री. महाराज साहेब यांस या सर्व गोष्टींचें श्रेय आहे. प्रथम इतर लोकांचें धारिष्ट व्हावयाचें नाहीं, ह्मणून प्रजावात्सल्यानें स्वतः ज्यांही परदेशीं प्रवास करण्यास कंबर बांधली व आपला देश, राज्योपभोग एकीकडे ठेवून, प्रथम आपल्या प्रजेस श्री. महाराज साहेबांनीं कित्ता घालून दिला, आणि आमचे वर्तनास व विचारास निराळीच दिशा लावून दिली. लहानपणापासून विलायत हा शद्ब ऐकून माझे मनांत निरानिराळे तरंग येत असत. सुधारणेच्या शिखरास पोंचलेले, विद्येचें भांडार हस्तगत करून घेतलेले, सर्व जगावर आपला पराक्रम गाजविणारे व अमानुष कृती करून सर्व जगतास थक करून सोडणारे असे लोक ज्या देशांत परमेशानें निर्माण केले आहेत, तो देश एकवार तरी [illegible] अशी उत्कट इच्छा जागत होत होती; परंतु एका संस्कृत

कवीच्या उक्तिप्रमाणें मन धांव घेतें, परंतु साधनें नसल्यामुळें मनाचा उत्साह भंग होतो व सर्व मनोरथ जागचे जागींच विरमून जातात. त्याप्रमाणें माझीही स्थीति झाली असती; परंतु निराशेचे जे मेघ अंतःकरणाकाशास व्याप्त करीत होते, त्यांस श्री. **महाराज** साहेबांचे औदार्यरूपी वायूनें चाळवून दिलें. श्री **महाराज** साहेबांनीं कृपावंत होऊन, ता. २२ आगष्ट १८९४ रोजीं **स्काटलंड** येथून ना. दिवाण साहेब यांस पत्र पाठवून मला तिकडे पाठविण्याविषयीं हुकूम दिला. तें आज्ञापत्र येथें सप्टेंबरचें १६ तारखेच्या सुमारास पोंचलें. हुजूर आज्ञेअन्वयें ना. दिवाण साहेब यांनीं मला **विलायतेस** जाण्यास आज्ञा दिली, त्याप्रमाणें मी तारीख १३ आक्टोबर रोजीं **टेम्स** नांवाच्या मेल स्टिमरनें **मुंबईहून** निघालों. **विलायतेहून हिंदुस्थानांत** परत आल्यास, आज बरेच दिवस झाले. इतर प्रवासीजनांप्रमाणें केवळ आपले विचार लोकांपुढें मांडून, कवित्वाबद्दल वाहवा मिळविण्याचा माझा बेत नाहीं; तर कांहीं शहरांचा संक्षिप्त इतिहास लिहून नंतर त्या शहरांतील मुख्य मुख्य इमारतींचें साधारण दिग्दर्शन करावें असा आहे. **हिंदुस्थानांतून विलायतेस** जातांना, एडन येथें ता. १८ आक्टोबर रोजीं २-३० वाजतां दिवसां पोंचलों. तेथून **ब्यालारेट** नांवाच्या स्टीमरमधून **ब्रिंडीशी** येथें ता. २१ रोजीं रात्रीं १० वाजता पोंचलों. तेथून लागलीच एक्सप्रेस आगगाडीनें जाण्याचे तयारींत असतां, श्री. **महाराज** साहेबांचें आज्ञापत्र **प्यारिस** मुक्कामाचें ता. २१ चें आलें; त्यांत असा हुकूम होता कीं, ' तुह्मी **इटालींतील** मुख्य मुख्य शहरें पाहून नंतर पुढें जावें. ' सदर हुकूमान्वयें **इटाली** देशांतील जीं मुख्य मुख्य शहरें पाहिलीं, त्यांचें व **इटालींतून लंडन** येथें जातांना **प्यारीस** शहर लागलें, त्याचें अल्पसें वर्णन या पहिल्या भागांत दिलें आहे. श्री. **महाराज साहेबांचे**

कृपेनें पुढील भागांत इंग्लंड देशांतील मुख्य मुख्य शहरांचें वर्णन व स्पेन, पोर्च्युगल व फ्रान्स इत्यादि इतिहासप्रसिद्ध देशांतील शहरांचें वर्णन देईन. ज्यांचे कृपेनें व औदार्यानें माझें पाऊल पश्चिमेकडील सुधारलेल्या देशांत पडलें, त्या श्री. महाराज साहेबांचें सादर अभिनंदन करून, त्यांस दीर्घायुष्य प्राप्त व्हावें व दिवसें दिवस त्यांचा अभ्युदय व्हावा अशी रात्रंदिवस परमेश्वराजवळ प्रार्थना करितों.

ही अल्पशी प्रस्तावना पुरी करण्यापूर्वी, श्री. रावसाहेब संपतराव गायकवाड यांनीं मजविषयीं बंधुप्रीतीनें वारंवार जी तसदी घेतली व अनेक प्रसंगीं अमूल्य सल्लामसलत दिली, याबद्दल त्यांचे फार फार आभार मानून, ही प्रस्तावना पुरी करितों.

बडोदें:—बाबाजीपुरा. तारीख २८ सप्टेंबर सन १८९५

जो॰ भा॰ खासगीवाले.

अनुक्रमणिका.

श्री.

दसऱ्याचें सोनें

अथवा

विलायतेची सफर.

भाग पहिला.

पांपी आणि नेपल्स.

ता. २७ अक्टोबर १८९४ रोजीं सकाळीं ९॥ वाजतां ब्रिंडिसी येथून निघालों तों नेपल्स येथें संध्याकाळीं ५॥ वाजतां पोंचलों. नेपल्स शहराहून दहा वाजून तीस मिनिटांनीं पांपी या नांवाच्या शहराकडे जाण्यास निघालों. सुमारें दोन प्रहरचे अकरा वाजतां, त्या ठिकाणीं आह्मी दाखल झालों. प्राचीन काळीं हें शहर फार भरभराटींत होतें व त्या वेळेस येथील लोकसंख्या सुमारें ३० तीस हजार होती. इटली देश परमेश्वराचे मर्जीतला खराच, तथापि नेपल्स व आजूबाजूचीं शहरें येथील हवापाणी फारच उत्तम आहे. आहोरात्र सुखांत रहावयास सांपडलें तर लोक उन्मत्त होतील व माझे स्वरूपाची त्यांस ओळख रहावयाची नाहीं;

म्हणूनच कीं काय परमेश्वरानें ह्या ठिकाणीं व्हेसुव्हियस या नांवाचा ज्वालामुखी पर्वत स्थापित केला आहे. ज्वालामुखी पर्वताचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर मनुष्य अगदीं विस्मित होऊन जातो.त्या पर्वताचे पोटांत हजारों खंडी गंधक व लोहरस कढत असतो व ही क्रिया फार झाल्यावर, हे सर्व पदार्थ बाहेर पडण्यास प्रारंभ होतो. पांपी शहरचे नाशास दोन मोठे प्रबळ शत्रु आहेत. एक तर वर निर्दिष्ट केलेला हा ज्वालामुखी पर्वत व दुसरा धरणीकंप. ह्या दोन शत्रूंचा प्रतिकार करण्याचें मानवांचें स्वाधीन नाहीं, असें स्पष्ट दिसतें. हें शहर फार प्राचीन आहे. इ. स. ६३ सालीं ह्या शहरीं धरणीकंप झाला; त्या वेळेस ह्या शहराचा बराच नाश झाला; परंतु तेथील लोकानीं पुष्कळ मेहनत करून, पांपी शहर मोठ्या थाटानें उठवून दिलें. ह्या शहराचा इतिहासामध्यें उल्लेख इ. स. पूर्वी ३१० वर्षांच्या पाठीमागें केलेला आहे. वर सांगितलेल्या धरणीकंपा नंतर थोड्याच अवकाशांत दुसरा एक धरणीकंप झाला, त्या वेळेस मोठमोठीं मंदिरें, नाटकगृहें आणि इतर नागरिकांचीं गृहें जमीनदोस्त झालीं! ह्या प्रसंगाचें विस्मरण पडतें न पडतें तोंच इ. स. ७९ वे वर्षी ह्या शहरावर गहजब गुजरला. ह्यामुळें ह्या शहरचे पूर्ववैभव नष्ट होऊन, हें केवळ स्मृतिगत झालें. हा प्रसंग आगष्ट महिन्याचे २४ तारखेस गुजरला. हा दिवस सणाचा होता. सर्व नागरिक पोषाख करून, आपल्या वयस्यांबरोबर, करमणुकींत गुंतले होते. वाद्यांची, गाण्याची, नाचाची व इतर सर्व साधनांची एकच गर्दी उडून गेली होती, अशा ह्या ऐन सुखाच्या वेळीं त्या लोकांच्या सुखांत माती कालविण्याची इच्छा त्या पाषाणराशीस होऊन, वर्षाव होण्यास प्रारंभ झाला. वर्षाव म्हणतांच गारवर्षाव आपल्यास वाटला असेल, पण तसें नाहीं. हा वर्षाव कढत कढत रूक्ष राखेचा होय. हा प्रकार काय म्हणून पहाu

त्याकरितां ज्यांनीं ज्यांनीं नजर वर केली, त्यांचे नेत्र त्यांस सोडून चालते झाले! ऊनऊन्ह राख डोळ्यांत गेल्यावर मग काय अवकाश! याप्रमाणें एकसारखा वर्षाव चालून सर्व शहरभर व आसपास रस्त्यांत व आगणांत तीन फूट थर कढत फुफाट्याचा झाला.

लहान मुलांचीं व कोमलांगींचीं गात्रें म्लान होऊन, सर्व दीन होऊन गेलीं. हा प्रकार कांहींसा थांबल्यावर सर्वांस मोठा आनंद होऊन हर्षप्रदर्शक आलिंगनें व चुंबनें चाललीं आहेत; तों व्हेसुव्हियस पर्वतांतून लोहरसाचे प्रवाह उद्भूत होऊं लागले व सर्वत्र आनंदाचा अगदीं कळस झाला. जे पळून लांब गेले त्यांचा कांहींसा बचाव झाला; परंतु धनलोभानें जे फिरून घरांत शिरले त्यांची तेथेंच आहुती पडली. एकंदरींत या प्रसंगीं दोन हजारांवर प्राणहानी झाली. ही लोहवृष्टि होत होत हिचे आठ फूट जाड सर्व आवरण शहरभर पसरलें. मनुष्यें, जनावरें, लहान सहान घरें, बागा अगदींच गडप झाल्या. मोठ मोठीं मंदिरें खालीं ढासळलीं. वृक्ष उलथून पडले, विहिरी व तळीं बुजून गेलीं. एक घटकेच्या पूर्वी ज्या ठिकाणीं नाना तऱ्हेचे व्यवसाय चालले होते, विलासी लोक ज्या ठिकाणीं एकमेकांस रंजवित होते व नाच बैठकी जेथें चालल्या होत्या, त्या ठिकाणीं परमेश्वराची अवकृपा होतांच, जिकडे तिकडे ओसाड उकीर दृष्टीस पडू लागला! हें वर्तमान ज्या ज्या ठिकाणीं गेलें, त्या त्या ठिकाणीं लोकांना अति हळहळ लागून उद्विग्नता प्राप्त झाली. कांहीं काळ पावतों या शहराचें व त्या पाषाणहृदयाचें नांव देखील उच्चारण्यास लोकांस धारिष्ट होईना. कांहीं शतकें लोटल्यावर लोकांचे मनांतील भिती जाऊन, शोध करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. तोंपर्यंत या शहरावर वीस फुटांचा थर चढला. शोध करण्याचें काम

एक सारखें चालू ठेवल्यास अद्यापि ६० वर्षे पूर्ण शोध लागण्यास लागतील व एकंदर खर्चसहा लक्ष फ्रँकपेक्षां जास्ती लागेल, असा एका शोधकानें अंदाज केला आहे. कांहीं कांहीं मंदिरें व घरें शोधून काढिलीं आहेत. जीं दृग्गोचर होतात तीं केवळ आकारमात्र राहिलेलीं आहेत. येथील गृहस्थजन आपापल्या व्यवसायांत व्यास झालेले असे दृष्टीस पडतात. कोणी पलंगावर निजलेले, कोणी कोचावर बसलेले, कोणी अश्वारुढ झालेले, ज्या त्या ठिकाणीं पूर्वदेहकांति टाकून केवळ रक्षामय व लोहरसमय झालेले दृष्टीस पडतात. हे सर्व पदार्थ महाप्रयासानें काढून नीट व्यवस्थेनें लावून ठेविले आहेत. ते पहिले क्षणजे क्षणभर मनुष्य आश्चर्यचकित होतो. एकंदर सुखाचें क्षणभंगुरत्व त्याचे हृत्पटावर प्रतिबिंबित होतें. ओठा जवळ नेलेला प्याला घोट घेण्यास अवकाश न मिळतां, तेथेंच कसा थांबतो, त्याचीं येथें अनेक उदाहरणें आहेत. शहर अंडाकृति वसविलें आहे. शहरास प्राकार असून त्यास अष्ट महाद्वारें आहेत. नगराचा अर्धा भाग शोधन केला आहे. शहरांतील रस्ते दगडी फरशीचे आहेत. रस्ता अरुंद फार परंतु सरळ आहे. रस्त्याचे बाजूस पादचारीजनाकरितां, वर्षाऋतुमध्यें पायास पंकसंसर्ग न व्हावा ह्मणून, दगडाच्या पायऱ्या बसविल्या आहेत. त्यावेळेस चालू असलेल्या सभांच्या जाहिराती, दुकानदारांचीं नावें व वारांगनांचे वसतिप्रदेश दाखविण्याकरितां रतिमदनाचीं काढलेलीं चित्रें स्पष्ट दृष्टीस पडतात व इतर चित्रें अझून बारीक दृष्टीनें पाहिलीं असतां, स्पष्ट दिसतात. रस्त्याचे बाजूस जलोद्धारयंत्रें आहेत, सद्यः घरें ओबडधोबड दिसतात. भिंती विटांच्या किंवा प्युमीस दगडाच्या बांधल्या असाव्यात असा भास होतो. सोपानपंक्ति अझून दृष्टीस पडतात; त्यावरून हीं घरें दोन किंवा तीन मजली असावींत असा तर्क करिता येतो. ज्याठि-

काणीं दुकानें असावींत असें वाटतें, तीं स्थळें रहदारीचीं असलीं पाहिजेत हें उघड आहे. दुकानांमधून अनेक प्रकारचे जिन्नस, मांडून ठेवलेले दृष्टीस पडतात. कंदुकक्रिडेकरितां तयार केलेले संगमरवरी दगडाचे चेंडू व मद्यविक्रय करण्याकरितां अनेक सुबक सुरया मांडून ठेविल्या आहेत, त्या अजून जशाच्या तशाच दिसतात. बहुतेक घरांची रचना तशीच सारखी आहे. घरांत जाण्यास एक अरुंद मार्ग आंत असून, भोंवतां चौरस पडव्या, आत पाण्याचे हौद, भिंती चित्रांनीं रंगविलेल्या अशा आहेत. ह्या लोकांचे आवडीचे रंग ह्मटले ह्मणचे पिवळा व तांबडा हे होत. एकंदर शहरचे रचनेवरून हे लोक मोठे विलासी असावेत असा ग्रह होतो. शहराच्या मुख्य दरवाज्यानें प्रवेश केला ह्मणजे जवळच तेथील पदार्थसंग्रहालय लागतें. ह्या आलयांत मनुष्यांची प्रेतें दृष्टीस पडतात. अंगावरील मांस वगैरे नाहींसे होऊन देहासभोंवतीं बसलेला राखेचा लेप, कठिण होतां होत अगदीं दगडासारखा बनून, देहाची प्रतिमा बनली आहे. कांहीं प्रेतांचे अंगावरील अलंकार अजून स्पष्ट दृष्टीस पडतात. एक कुत्रा, दोन स्त्रिया व दोन पुरुष अद्यापि स्वस्थ झोपीं गेले आहेत असा भास होतो. ह्याशिवाय दृष्टीस पडणारे पदार्थ, झाडें, हाडकें, कुलपी असलेलीं द्वारें, रथचक्रें, घोडे, कुक्कुट, आपोलोचा पुतळा, स्वयंपाकाचीं उपकरणें, वजन करण्याच्या तागड्या, हरतऱ्हेचीं फळें, भाकरी, जनावरांचीं शिंगें, कांसवें, एक पेटी इत्यादि पदार्थ दृष्टिगोचर होतात. याच पदार्थसंग्रहालयाजवळ न्यायगृह आहे. या ठिकाणीं मोठमोठे विशाल स्तंभ आहेत. न्यायाधिशांचें उच्चासन व गुन्हेगार लोकांस शिक्षा देण्याचें स्थानही दृष्टीस पडतें. या न्यायगृहापासून थोडेच अंतरावर टर्मोदेवीचें प्राचीन देवालय आहे. पांपी शहरांतील मुख्य जागेस फोरम असें ह्मणत असत. ह्याचे सर्व स्तंभ स्फटिकाचे आहेत व भींति विटांच्या आहेत. ह्याच फोरममध्यें


ज्युपिटरचें मंदिर आहे. आंतील आंगण ९१९ फूट लांब व १०९ फूट रुंद आहे. ह्या मंदिरांतील भूमिका संगमरवरी दगडांनीं परिष्कृत केली आहे. डावेकडील बाजूस धर्मोपदेशकांचे मठ आहेत. ठिक ठिकाणीं सार्वजनिक स्नानगृहें दृष्टीस पडतात. भिंतीवर काढलेलीं चित्रें, अद्यापि तशींच दृष्टिगोचर होतात. एका रस्त्यामध्यें तर रथ चक्रांच्या उमटलेल्या धांवा अद्यापि तशाच दिसतात. घरांची बहुतेक रचना ह्मणजे प्रारंभीं स्वागतपर वाक्यें लिहिलेलीं, नंतर स्नानगृहें, नंतर शय्यागृह, नंतर मुख्य महाल आणि भोजनगृह व अगदीं पश्चात् भागीं उद्यानें हीं होय. आर्फस मंदिरामध्यें आर्फस हा मुरली वाजवितो आहे. मुरलीच्या सुस्वर रवास सिंह, व्याघ्र, रानडुकर, हरिण आणि ससे लुब्ध होऊन एकत्र झाले आहेत, कांहीं कांहीं गृहांतून बिभत्स चित्रें आहेत त्यांत एकंदर स्त्रीपुरुषाचे संबंध दाखविले आहेत. धान्याचें पीठ करण्याचीं चक्रें, पाण्याच्या तोट्या अजून दृष्टीस पडतात. पलिकडे साबणाचा कारखाना होता. बाजार भरण्याचें मार्किट त्रिकोणाकृति आहे. नाटकगृह जवळच आहे व त्याच्या अर्धचंद्राकृति रांगामध्यें बैठकी मांडिल्या आहेत. रंगभूमि चांगली स्पष्ट ओळखतां येते. हा चमत्कार पाहून सुमारें दोन वाजतां आम्ही परत आलों. जवळच्याच एका पथिकाश्रमांत भोजन केल्यावर नेपल्स मधील कांहीं कांहीं ठिकाणें पाहण्यास गेलों. नेपल्स शहरांत समुद्रकांठीं नॅशनलगार्डन् नांवाचा सुंदर बाग आहे. ह्या बागेंत सर्व प्रकारचे जलचर प्राण्यांचा संग्रह केलेला आहे. एक कृत्रिम सरोवर करून त्यांत समुद्राचें पाणी आणून सोडिलें आहे. नेपल्सच्या उपसागरांतून रौप्यवर्णाचे मासे आणले आहेत. शेलफिश, कटकफिश, सुवर्ण, पीतवर्ण, कांहीं अनेक रंगाचे मासे, विंचवाच्या आकृतीचे, कांहीं कांहीं काळे रंगाचे, नानातऱ्हेचे कांसव, कांहींच्या

अंगावर चित्रविचित्र ठिपके, कांहीं चंद्रकांत रंगाचे, कांहीं ईक-फिश व इलेक्ट्रिफिश भातीचे, पलीकडे एका तळ्यांत पोंवळी करणारे प्राणी ठेविले आहेत. त्यांचा विद्रमघटनेचा एकसारखा सपाटा चालला आहे. फुलाच्या आकृतीचे प्राणी ज्यावेळेस पाण्यावरून चालतांना दृष्टीस पडतात, तें पाहून मनुष्यास मोठेंच कौतुक वाटतें. ह्या ठिकाणीं प्राण्यांचे समुदाय लावून ठेविले आहेत. बागेमध्यें जिकडे तिकडे पुतळे मांडून ठेविले आहेत. एक मोठा जयस्तंभ आहे. उद्यानाचे पाठीमागें एक मोठा पथिकाश्रम आहे. ह्या आश्रमाचे पाठीमागें एक डोंगराची रांग लागली आहे. नंतर शियाजा या रस्त्यांतून परत यावयास निघालों: ह्या रस्त्यांत स्वतंत्र देवीचा एक पुतळा ठेविला आहे. नंतर टोलेडो या नांवाच्या रस्त्यांतून व्हिक्टोरिआ रस्त्यांत आलों. वाटेंत पदार्थसंग्रहालयें पुष्कळ आहेत. २९ तारखेस सकाळीं नऊ वाजतां नेपल्स शहराजवळ असलेल्या पाझोली व बाजा हीं शहरें व सल्फर होल्क्यानो (गंधक ज्वालामुखी) हें पाहण्यास आम्ही गेलों. पाझोली हें शहर फार जुनें आहे. ह्यामध्यें पुष्कळ टेकड्या असून, त्यांतून गंधक खालीं पडत असतो. गंधक धुराचें रूपानें प्रथम बाहेर पडतो व मग त्याचे कठिण अवयव बनतात. बाचा गाडींतून जातानां चांगला देखावा दृष्टीस पडतो. गाडी उंचावरून जाते त्या वेळेस पाझोलीचा उपसागर, रोमन लोकांनीं खोदलेले बोगदे, इसाचिया नांवाचें बेट, हीं दृष्टीस पडतात. अकरा वाजतां त्या गंधकज्वालामुखी जवळ आह्मी गेलों. ह्या ज्वालामुखी पर्वताचे मुखांतून गंधक एकसारखा बाहेर पडत आहे. आसपासची जमीन अगदी पोकळ आहे. टेकडीचे पायथ्याशीं पुष्कळ गांवें वसलेलीं आहेत. आपोलो देवतेचें देऊळ अगदीं जार्ण झालें आहे. जवळ एक भव्य नाटकगृह आहे. ह्यामध्यें वन्यपशू आणवून त्यां-

च्याशीं बंदीवान केलेल्या शत्रूचे नेहमीं युद्ध खावीत असत. वन्यपशू ठेवण्याचीं भुयारें चांगलीं आहेत. नौकावाहनामध्यें कौशल्य दाखविण्या-करितां नेहमीं खेळ होत असत; त्या वेळेस आंत पाणी आणण्याकरितां मोठ मोठे रस्ते ठेविले आहेत. ह्या जलनलिकांतून समुद्राचें पाणी आंत घेत असत. जवळ ज्युपीटरचें देवालय आहे. एका घरामध्यें प्रसिद्ध ग्रीक वक्ता सिसरो ह्याचा रथ जपून ठेविला आहे. ह्या गांवाजवळ एक शहर नवीन वसलें होतें, परंतु ह्या ज्वालामुखी-मुळें त्याचा नाश झाला. ल्युक्रिनो ह्या नांवाचें एक सरोवर आहे. त्या सरोवरांत लाव्हा पडलेला आहे, त्यामुळें ह्या सरोवराचे दोन सारखे विभाग झाले आहेत. रोमन बादशाह नेरो याचें स्नानगृह जवळच आहे. ह्या ठिकाणीं अति उंची मद्य तयार केलें जातें. डायना देवी, मर्क्युरी आणि व्हिनस यांचीं देवालयें अगदीं भग्न झालीं आहेत. इतकें पाहून सुमारें साडेबारा वाजतां परत आलों. एक वाजून तीस मिनिटांनीं बाजा हें शहर पाहण्याकरितां निघालों. वाटेंत नेपोलियन राजकुळाची स्मशानभूमिका लागली. ज्या झाडा-च्या साली लिहिण्याचे उपयोगांत आणीत होते, तो प्यापर नांवाचा वृक्ष येथें पाहाण्यास सांपडला. तीन वाजून तीस मिनिटांनीं नेपल्स शहरीं फिरून दाखल झालों. नंतर कांहीं दुकानें पाहिलीं. दुकानांमध्यें जवाहिराचें काम फारच सुबक दृष्टीस पडलें. पोंवळ्याचें व कांसवांचे पाठी-चे दागीने येथें फार सुरेख होतातः पुन्हां दुसरें दिवशीं ह्मणजे तारीख ३० आक्टोबर रोजीं नेपल्स एथील प्रसिद्ध संग्रहालय पाहण्यास गेलों. सुमारें अर्ध्या तासानें त्या ठिकाणीं आम्ही दाखल झालों. नंतर तिकिटें काढून काठ्या बाहेर ठेविल्या व आंत प्रवेश केला. प्रथम चित्रकलेचा संग्रह, पांपी शहराहून आणलेले अनेक चमत्कृ-तीजनक पदार्थ, तेथून आणिलेले अनेक प्रकारचे रंग, रोम शहरांत

सांपडलेले दोन मोठे स्तंभ, **आकिलीस** ह्याचा एक अभंग दगडाचा पुतळा, शुभ्र स्फटिकाचा एक विशाळ वृषभराज, डायना देवीचा पांपीमध्यें सांपडलेला पुतळा, **व्हिनस** आणि **आंडोनिस** (रती आणि मदन यांचे मुखवटे) हीं सर्व पाहण्या जोगीं आहेत. **होमर** कवीचा पुतळा त्याचेच जवळ अधिष्ठित केला आहे. त्याचप्रमाणें समुद्रदेवी व **निरो** राजा यांचे पुतळे आहेत. येथें पांपीहून आणिलेलीं उत्तम चित्रें, रोममध्यें सांपडलेले **आमाझान आटलस,** डेलफीन, मदन, लढाईचा देव इत्यादिकांचे पुतळे, हर एकजनावरांचे पुतळे, गॅलॅडियटर लोकांचीं हजारों शस्त्रें, ऑइल पेंटिंग्स, शिल्पकलेस लागणारीं हजारों हत्यारें, पांपी शहरचा बुचाच्या लांकडाचा नकाशा, हजारों देशांतील जुनीं नाणीं, मोठमोठ्या खणांत घालून ठेविलीं आहेत. पदार्थसंग्रहालय पाहून आम्हीं येथील प्रार्थनामंदिर पाहण्यास गेलों. हें देऊळ बांधण्यास आंजानें आरंभ केला व नातवाच्या हातून हें काम शेवटास गेलें. ह्या देवळांत शिरण्याचे अगोदर आमच्या टोप्या काढून ठेविण्याची विशेष आग्रहपूर्वक सूचना झाल्यावरून, आम्हीं तसें केलें. आंतमध्यें तेथील चित्रकलेंत प्रवीण अशा चित्रकारांच्या हातून काढविलेलीं हजारों सुंदर चित्रें एक रांगेनीं मांडून टेविलीं आहेत. ह्या मंदिराचीं महाद्वारें पंचरसी धातूचीं ओतलेलीं आहेत. ह्या मंदिरांतील संग्रह पाहून पुढें **संटमार्टिनो** याचें देवालय पाहण्यास गेलों. ह्या देवळाची रचना चागली आहे. अनेक रंगाचे संगमरवरी दगड मिळवून मोठमोठे खांब रचले आहेत. आंतील संग्रह फारच अलौकिक आहे. प्राचीन राजांचीं जुनीं वस्त्रें, त्यांचीं शस्त्रें, त्यांचीं वाहनें, त्यांच्या नौका सर्व मोठ्या काळजीपूर्वक जतन करून ठेविल्या आहेत. विस्तीर्ण असे सात दिवाणखाने अशा तऱ्हेच्या वस्तूंनीं भरून गेले आहेत. येथील वेदिका मरकत नांवाच्या

पहिल्या पंधरवड्यांत फार थंडी पडते. त्यावेळीं पारा ६५ अंशावर असतो. आकाश निरभ्र असतें. नोव्हेंबरमध्यें थोडा पाऊस पडतो. डिसेंबरांत हवा साधारण थंड असते, या दिवसांत पारा ५० पन्नास अंशावर असतो; तोच पारा ज्यानेवारी महिन्यांत कधीं कधीं २८ अंशावर येतो. या शहरामध्यें बहूत करून कधीं बर्फ पडत नाहीं; परंतु आसपासचे डोंगर बर्फ आच्छादित असतात. ज्यानेवारी किंवा फेब्रुआरीच्या शेवटीं पावसाळा सुरू होतो, तो बहुशः एप्रील महिन्यापर्यंत असतो. मे महिन्यांत येथील हवा फारच उत्तम असते. जून, जुलई व आगष्ट ह्या महिन्यांत पारा कधीं कधीं शंभर अंशांपर्यंत चढतो. प्रवासी जनांनीं नेहमींपेक्षां गरम कपडे वापरावेत ह्मणजे त्यांचे आरोग्याचें संरक्षण होईल व उन्हाळ्यांत उन्हामध्यें कधींही फिरू नये.



रोम.

आह्मी नेपल्स शहराहून ता. १० रोजीं रात्रीं १० वाजतां निघालों, तें रोम शहरीं सकाळचे ६-३० वाजतां दाखल झालों. फार प्राचिन काळापासून रोम हें शहर पाश्चात्य विद्येचें आदिपीठ आहे. आजपर्यंत जगामध्यें जे जे राजपंथ झाले ते सर्व ह्या ठिकाणीं *उत्कृष्ट स्थितीला जाऊन पोहचले आहेत. ह्या ठिकाणीं लोकसतात्मिक, नृपसत्तात्मक, धर्मगुरुसत्तात्मक आणि नृपप्रजा-प्रतिनिधिसतात्मक इत्यादि अनेक प्रकार होऊन गेले. दोनहजार वर्षांपूर्वी ह्या लोकांनीं लिहिलेले कायदे व व्यवस्था अझून सुधारलेल्या देशांमध्यें प्रमाण मानले जातात. ह्या नगरांतील कोणतेही भागांत आपण गेलों तरी तेथलि नष्ट वैभवाची स्मृति होऊन, आपलें मन उद्विग्न होतें. ज्यांतील प्रत्येक नागरिक योद्धा कृषिबलतत्ववेत्ता होऊन गेला; ज्यांहीं केलेले तत्वविचार अद्यापि लोकांस अद्भुत व अगम्य वाटतात, ज्यांना सद्यः-पेक्षांही विद्येची अभिरुचि अधिक होती, ज्यांनीं कलाकौशल्याची सीमा पाहिली, युद्धकला पूर्णतेस नेली, जेथें लोकांचे सुखाविषयीं रात्रंदिवस झटणारे आचाट धाडसी व अलौकिक बुद्धिबलाचे सीझर सारखे त्रिलोकसूर्य होऊन गेले; त्यांचे शहरांत आपला पाय पडल्या बरोबर मनामध्यें पराकाष्टेची पूज्यबुद्धि उत्पन्न होते. रोमन पातशहांचीं तोरणें फडकूं लागलीं व रोमन योद्धे दूर देशावर स्वाऱ्या करूं लागले; त्यावेळेस इतर राष्ट्रें केवळ बाल्यावस्थेंत होतीं. या रोम नगराची स्थापना करणारा रोम्युलस या नांवाचा बादशहा होय. त्यानें हें शहर इ. स. पूर्वी ७९३ वे वर्षीं वसविलें. ह्मणजे

त्या गोष्टीस आज सुमारें सत्तावीसशें वर्षे होऊन गेलीं. कांहीं कांहीं ठिकाणीं जमीन शोधून त्यांत सांपडलेले शिलालेख फार जतन करून ठेविले आहेत. जुन्या शस्त्रांच्या रचनेवरून कोणत्या काळचीं हीं शस्त्रें असावींत ह्यांचा निर्णय शोधकांनीं केलेला आहे. त्यांतील कांहीं कांहीं शस्त्रें गारांचीं केलेलीं आहेत. त्यावरून खनिज धातु माहीत नव्हत्या, त्यावेळचीं हीं शस्त्रें होत हें खास अनुमान करितां येतें. ह्मणजे ही गोष्ट जगाच्या प्रारंभाची आहे असें ठरतें. देशाची हवा उत्तम असल्यामुळें व समुद्रकांठ जवळ असल्या कारणानें, देशाची सुधारणा होण्यास सुरवात झाली. **फारम** व **कॅमिटोलिन** हीं दोन ठिकाणें त्यावेळीं बांधण्यांत आलीं. ह्या दोन्हीं इमारती सार्वजनिक उपयोगाच्या होत्या. हें शहर व्यापाराच्या फारच सोईचें होतें; कारण त्या वेळच्या रोम शहराजवळ टायबर नदी वाहत असे. त्या वेळेस नदीचें पात्र नांवाजण्यासारखें विस्तीर्ण असे व पाणी खोल असे, त्यामुळें समुद्रांतून जहाज आलें कीं, तें थेट रोमनगरीच्या अगदीं सन्निध येऊन पोंहचे; त्यामुळें इतर ठिकाणचेही लोक पुष्कळ येऊं लागले व शहराची भरभराट होत गेली. पुढें अनेक संस्था स्थापन झाल्या, शहराच्या सुधारणेकडे लोकांचें लक्ष जाऊं लागलें व शहराभोंवतीं **सर्व्हियन** राजानें एक टोलेजंग कोट उठवून दिला. ज्या ठिकाणीं टेकड्या वगैरेचा समावेश करितां आला नाहीं, त्या ठिकाणीं भिंतीची रुंदी ऐशी फूट आहे व पुढें शंभर फूट रुंद असा खंदक खणला आहे. ही जी जोरानें भरभराट झाली, ती **टार्कीयन** नांवाचे राजाच्या कारकिर्दीत झाली. इसवी सनापूर्वी ५०० वर्षी ह्या राजास पदच्युत केलें. हे राजे फार जुलमी व दुर्व्यसनी होते. ह्या नंतर प्रजासत्तात्मक राज्य स्थापित झालें; परंतु पुढें ग्यॉली लोकांच्या स्वाऱ्या ह्या देशावर सुरू झाल्या; त्यामुळें जरा व्यवस्था डळमळीत होऊन पादशाहीचा लौकरच

ऱ्हास होतोसा वाटला. पुढें पुनिक नांवाचीं युद्धें सुरू झालीं व त्या नंतर प्रजासत्तात्मक राज्याच्या लष्करी जुलमाची पातशाही बनली. जो मोठा सेनापति तोच राज्याचा मालक, याप्रमाणें कांहीं दिवस व्यवस्था चालली. ह्या पैकीं आगस्टस नांवाच्या राज्यधुरंधरानें सुमारें शंभर मंदिरें नवीन उभारलीं व कांहींचा जीर्णोद्धार केला. ह्याच कुलामध्यें एक निरो नांवाचा राजा झाला. ह्या राजानें असा विचार काढला कीं, सर्व रोमन पातशहांनीं इमारती उभारण्याचें काम तसेंच पुढें चालू ठेविलें, परंतु आपण तसें न करितां सर्व शहरास आग लावून द्यावी व सर्व शहरची राखरांगोळी झाल्यावर, आपण मग नव्या इमारती बांधण्यास सुरुवात करावी, ह्मणजे सर्वांचे वर ताण केली असें होईल. असा विचार आणून सर्व शहरास आग लावून दिली व फिरून नवीन इमारती बांधण्याची सुरुवात केली. हें ज्युलीयन नांवाचें घराणें झालें. यानंतर फ्लॉवियन नांवाचें घराणें गादीवर आलें. ह्या राजाच्या कारकिर्दींत पुष्कळ नवीन इमारती बांधण्यांत आल्या व शिल्पशास्त्राची परमावधी झाली. त्यावेळेपासून ह्या राजसत्तेचा हळू हळू ऱ्हास होऊं लागला. फ्लॉवियन नांवाच्या घराण्यानंतर आंटोनाइन्स नांवाचें घराणें गादीवर आलें. त्यावेळीं जिकडे तिकडे शांतता होती; परंतु थोडक्याच अवकाशांत जिकडे तिकडे लढाया झाल्या. ह्याप्रमाणें राज्यसत्तेला जो ग्रह आला, त्या ग्रहानें राज्यसत्ता नाहींशी झाली व त्या ठिकाणीं धर्मसत्तेचें प्राबल्य वाढत चाललें. इसवी सन ३३६ ह्या वर्षी कान्स्टान्टाइन बादशहानें बाप्तिस्मा घेतला. ह्याप्रमाणें प्रत्यक्ष बादशहाकडून ह्या धर्मास उत्तेजन मिळालें. त्यामुळें अनेक ख्रिस्ती प्रार्थनामंदिरें बांधिलीं गेलीं. परंतु मंदिरें बहुतेक नगराबाहेर आहेत, कारण बहुतेक लोकांची प्रवृत्ति स्वधर्माकडे असे; परंतु होनोसियो राजानें जुन्या धर्माचीं मंदिरें मोड-

ण्याचा व त्या ठिकाणीं ख्रिस्ती मंदिरें उभारण्याचा सपाटा चालविला. एकंदर ख्रिस्ती मंदिरें सत्तावीस अठ्ठावीस बांधिलीं गेलीं व धर्माचें संस्थान स्थापित झालें; त्यावेळेपासून राज्याची सत्ता लयास जाऊन, धर्मगुरूचें प्राबल्य झालें. नंतर इतिहासांत प्रसिद्ध असलेलीं सात देवालयें बांधण्यांत आलीं. त्या देवळांस सर्व युरोपखंडांतील लोक दर्शनलालसा धारण करून, यात्रा करूं लागले. पुढें चौथ्या शतकामध्यें, रोमवर एका पाठीमागून एक संकटें ओढवलीं. रोगग्रस्त सर्व प्रजा झाली. व्हाडल व **गॉथ** या लोकांच्या स्वाऱ्या जारीनें सुरू झाल्या. इसवी सन ५४६ ह्या वर्षी **गॉथ** लोकांचा राजा **रोम** शहरामध्यें शिरला, त्या वेळेस ह्या शहरामध्यें सुमारें पांचशेंपेक्षां अधिक लोक दृष्टीस पडले नाहींत. ह्या वेळेस अगदींच लय होऊन रोमची सत्ता **बायझनटाईन** लोकांच्या सत्तेशीं मिश्रीत झाली व त्या अमलाखालीं रोम गेलें. यावेळीं रोम अगदींच विलयास गेलें असतें; परंतु ख्रिस्तीधर्माचा प्रसार झाल्यामुळें, ह्या राज्याचा कांहींसा बचाव झाला. ख्रिस्ती धर्माची स्थापना झाली व पुढें जी पायमल्ली झाली, ती मध्यें कांहीं फारच कर्ते होऊन गेले आणि त्यांत विशेषतः **लियो** आणि **ग्रेगरी** हे तर फारच प्रसिद्ध होऊन गेले. रोमनगरीं लोकांचे महत्व राहिलें होतें तें धर्मगुरूच्या वास्तव्यामुळें कायम होऊन, त्यांत आणखी भर पडली. ह्या गुरुद्वयाचा व त्यांच्या अनुयायांचा मुख्य हेतु रोम शहराला स्वतंत्र करण्याचा होता. त्याचप्रमाणें जर्मनीमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याकडे त्यांचें फार दिवसांपासून लक्ष होतें. पुढें इसवी सन ७२७ मध्यें **लुटप्रेन्डराजानें सुट्री** या नांवाचें शहर जिंकून घेऊन पोप महाराजांस अर्पण केलें. अशा प्रकारची ही पाहिलीच भेट होय. ह्या शहरच्या रक्षणाचे निमित्तानें बायझन्सीयनचे अमलांतून रोम शहरांत मुक्त केलें. ह्याप्रमाणें जिकडे तिकडे पोपशाही-

चा बोध होऊं लागला- युरोप खंडांतील राज्यप्रकरणीं गोष्टींमध्यें देखील त्याची मदत लागूं लागली. इ० स० ८०० वर्षी पोपशाही-चा प्रारंभ झाला. त्याप्रमाणें राजसत्तेची क्रांती झाली खरी; परंतु ह्या शहराला जी उतरती कळा लागली ती लागलीच. जर्मन, वगैरे अनेक लोकांनीं पाठोपाठ स्वाऱ्या करून, शहरची दैना केली. ह्या लढायांमध्यें प्रेक्षणीय प्रांताकरितां किल्ले बांधावे लागले व त्या किल्ल्यांना पूर्वीचीं मंदिरें मोडून त्यांचें सामान लाविलें. अशा तऱ्हेनें सर्व मंदिरें बहुतेक जमीनदोस्त होऊन गेलीं. ज्या ठिकाणीं दोन लक्ष वस्ती असे त्या ठिकाणीं वीस हजारांपेक्षांही लोकसंख्या कमी झाली; परंतु पुढें जरा कांहीं चांगली स्थिती आली. धर्मगुरूचे कोशागारांतील संपत्ति लोकां-च्या सोईकडे खर्च होऊं लागली. इ. स. १९२७मध्यें शार्लोन चार्लस ह्यां-ने हें शहर जिंकिलें. तो निघून गेल्यानंतर प्रजासत्ता स्थापन झाली. फिरून कांहीं दिवस फ्रान्सची सत्ता होती; परंतु फ्रेंको प्रशियन युद्धाचे वेळेस ह्या देशास कांहीं स्वतंत्रता मिळाली. जीं संस्थानें धर्मगु-रूच्या ताब्यांत होतीं तीं रोमच्या राज्यास सामील केलीं. फिरून एक-वार रोम मुख्य शहर बनलें. हल्लीं या शहरची लोकसंख्या साडेचार लक्ष आहे. टायबर नदी शहरांतून दक्षिणोत्तर वहात जात आहे. ह्या नदीस रोमशहरांत तीन वळणें आहेत व सात पूल आहेत. पात्राची साधारणतः रुंदी ६९ यार्ड आहे व खोली कांहीं कांहीं ठिकाणीं तीस फूट आहे. पूर्वी नदी जहाजें जाण्यायेण्याच्या सोईची होती. परंतु सद्यः प्रसिद्ध कविवर्य भवभूतीच्या—

पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरिताम् ।
विपर्यासं यातो घनविरलभावः क्षितिरुहाम् ।

अहोदृष्टं कालादपरमिवमन्ये वनमिदम् ।
निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं दृढयति ॥ १ ॥

या वाक्याप्रमाणें ती उपयोगाची नाहीं. ह्या नदीस एक कालवा काढला आहे. खुद्द रोम शहर टायबर नदीच्या डावे तटावर कांहीं मैदानावर व कांहीं टेंकड्यावर वसलें आहे. सांप्रत रोम बहुतेक मैदानांत वसलें आहे. प्राचीन काळीं रोम ज्या टेकड्यावर होतें त्या टेकड्या उद्वस्त झाल्या आहेत. शहराभोंवतीं प्राकार आहे. हें वर सांगितलेंच आहे. ह्या प्राकाराची लांबी दहा मैल आहे. आंत प्रवेश करण्यास आणि बाहेर जाण्यास तेरा दरवाजे आहेत. ही सर्व भिंत ईटबंदी आहे. बाहेरून या भिंतीची उंची ९९ फूट आहे. ह्या भिंतीचें बहुतेक काम इ. स. २७१ पासून २७६ चे दरम्यान झालें. ह्या कामास प्रारंभ **आरलियन** नांवाच्या बादशहानें केला व **प्रोबस** ह्यानें तें पुरें केलें. मध्यंतरीं झालेल्या राजांनीं व धर्मगुरूंनीं ह्याची पुष्कळ डागडुजी केली. इसवी सन १८७० पासून या भिंतीच्या मध्यंतरीं मोठमोठे किल्ले बांधून शहराला तटबंदी केली आहे. ह्या एकंदर भिंतीचा व किल्ल्याचा घेर तीस मैल आहे. एके काळीं ज्या ठिकाणीं चौदा विद्या व चौसष्ट कला वास करीत होत्या, मोठ मोठे **सिझर, मार्क अँटनी, अगस्टस** इत्यादि अतुल बाहुबलाचे रणधुरंधर होऊन गेले, मोठ मोठे तत्ववेत्ते होऊन गेले अशा ह्या नगराच्या प्राचिन इतिहासाचें अवलोकन न्यायानें करून, पथिकजनास अनुरूप असा आम्ही आपला क्रम ठेवून बाहेरें पडलों व एकंदर शहरची संद्यः स्थिति आणि इतिहासांत श्रुत असलेली प्राचिन स्थिति ह्यांचें अवलोकन केल्या बरोबर अतिशय विस्मय वाटला प्रथम. बाहेर पडलों तों

फ्लेवियन नांवाचे नाटकगृहाकडे गेलों. जगांत प्राचिन काळचीं जीं स्मारकें आहेत त्यांत हें अतिविस्तीर्ण आहे. हें फ्लेवियन नांवाचे बादशहानें बांधिलें. ह्या नाटकगृहाचे वास्तुशांतिचे वेळेस वरील नृपपुंगवानें जो उत्सव केला तो १०० दिवस चालला होता; ह्या वेळेस ५ हजार पशू होमकुंडांत अर्पण केले. ह्या इमारतीस पांच मजले आहेत; पैकीं वरील तीन मजले प्रेक्षकांकरितां आहेत व खालील दोन मजले वन्यश्वापदांकरितां योजिले आहेत. हजारों वन्यपशु या ठिकाणीं ठेविले असत. ख्रिस्ती लोकांवर जो कांहीं दिवस जुलूम चालला होता, त्या वेळेस वरचे ख्रिस्तानुयायी या पशूंच्या भक्षस्थानीं पडले; असो. येथून आम्ही कान्स्टन्टाईन बादशहानें उभारलेल्या विजयतोरणाकडे गेलों. ही एक विशाल कमान आहे. ही कमान इसवी सन ३१२ वर्षी कान्स्टान्टाइन बादशहानें म्याक्झेनटियस ह्याचा पराभव केला त्याचें स्मारक आहे. ह्या कमानीच्या सर्व बाजूवर इतिहासांतील मनोवेधक चित्रें खोदिलीं आहेत. ह्याचेजवळ प्रसिद्ध जगदेकवीर सिझर याचें मंदिर छिन्नभिन्न झालेलें दृष्टीस पडलें. सिझरचें नांव काढतांच, जवळ आला कीं काय ह्मणून भास व्हावयाचा, त्याच सिझरचे मंदिरांत आज कुत्रीं हाडें चावतांना दृष्टीस पडावीत, ह्या पेक्षां शोकास्तर तें काय ? ह्याचेच जवळ निरो राजानें बांधिलेलें गोल्डन होम पाहिलें; त्याचेच पुढें टिटस पादशहानें बांधिलेलें तोरण दृष्टीस पडलें. ह्या कमानीवर जरुशलेम शहराचा जो रोमन लोकांनीं विध्वंस केला, तो दाखविला आहे. पुढें रोमन फोरम लागलें. राम्युलस राजाचें देवालय त्याचेच पलिकडे लागलें. इतर अनेक शिल्पशास्त्रप्रणित रचनेनें बांधिलेलीं देवालयें आसपास पुष्कळ आहेत. ह्या सर्व भागाला ' रोमन फोरम '

ह्मणतात. ह्या भागांतील इमारतींची फरशी रंगीबेरंगी दगडांची आहे. ह्या ठिकाणापासून कांहीं अंतरावर सेंटमेरी या नांवाचें फार प्राचिन देवालय आहे; ह्या देवालयाला अनेक प्रकारचे खांब लाविले आहेत. मध्यें एक सुंदर सभामंडप आहे; एक पाषाणाचें कुंड असून त्या मध्यें होनोरिअस राजाच्या अस्थि जतन करून ठेवि-ल्या आहेत. पुढें क्यापिटल येथील चौकामध्यें प्रसिद्ध रोमन वीर मार्कस अरेलिअस याचा पुतळा आहे. हा आश्वारूढ आहे. ह्याची उंची ९५ फूट आहे. हा पूर्वींच्या रोम शहरांत सांपडलेला आहे. क्यापिटल राजवाड्याचे जिन्याजवळ कस्टार आणि पॉलाक्स ह्यांचे पुतळे आहेत. जवळ इतालीचा राजा व्हिक्टरएमान्युयल याचा पुत-ळा आहे. क्यापिटल नांवाचे राजवाड्याजवळ व्हेनीस नांवाचा प्रासा-द आहे. या प्रासादांत व्हेनीस येथील प्रतिनिधि राहतो. नंतर ग्यारा-बोल या नांवाचे विथिकेमध्यें गलों. येथें मिनरव्हा या नांवाचा एक चौक आहे. या चौकामध्यें आग्रीपा राजाचें शयनागार आहे. हल्लीं या शयन गृहाचें प्रार्थना मंदीर केलें आहे. या मंदिरामध्यें व्हाक्टरएमेन्युयल आणि रफावेर या नांवाचे प्रसिद्ध चित्रकारांचीं थडगीं आहेत. ह्या मंदिराचे खांब आफ्रिकन ग्रनाईट नांवाच्या दगडाचे केले आहेत. नंतर तेथूनच जवळ असलेल्या पँथिअन नांवाचे प्राचिन मंदिराकडे आह्मीं फिरलों. रोममध्यें फार प्राचिन काळचें आणि सुरक्षित राहिलेलें हेंच मंदिर आहे. ह्या मंदिराच्या पूर्वींच्या भिंती आणि घुमट अद्यापि केवळ नवेच दिसतात. ह्यांतील पूर्वींचे पुतळे व इतर स्मारकें काढून टाकिलीं आहेत. या इमारतीचा प्रारंभ आगस्टस नांवाचे राजाचे वेळेपासून झालेला आहे; ह्मणजे इसवी सनापूर्वी सत्ताविसावे वर्षी हें देवालय बांधण्यांत आलें. ट्रजन राजाचे कारकीर्दीत ह्या मंदिरावर

विद्युत्पात झाला. पुढें हेड्रीयन नामक राजानें त्याचा जीर्णोद्धार केला व सध्यां जें वर्तुलाकृती मंदिर दृष्टीस पडतें, त्याचें यश याच बादशहाला आहे. ह्यांतील कांहीं कांहीं भिंती वीस फूट रुंदीच्या आहेत व त्यांचे दर्शनी भाग संगमरवरी दगडांनीं बांधिलेले आहेत. एकंदर ह्या मंदिराचें काम फारच सुबक होतें. दर्शनी भागास जे आधारस्तंभ होते त्यांचा परिघ तेरा फूट असून उंची ३९ फूट असे. आठवा आर्बन या नांवाचे धर्मगुरूनें ह्या देवळास असलेल्या पंचरसी धातुच्या नळ्या काढून कांहीं सेंटपिटर नांवाचे मंदिरांतील हाय-आल्टर (स्थंडिल)वर असलेल्या खांबाऐवजीं लाविल्या व कांहीं-च्या आंजेलोच्या किल्ल्यावर तोफा करण्याकडे उपयोग केला. मंदिरांतील भाग फारच रमणीय आहे. आंतील घुमटाची उंची व व्यास सारखेच ह्मणजे प्रत्येक १४० फूट आहे. प्रकाश आंत येण्यास घुमटास एकच गवाक्ष ठेविलें आहे. भिंती कोरून त्यांत प्रसिद्ध योद्धा जुलियस सिझर व इतर देवता यांच्या प्रतिमा बसविल्या आहेत. मारबल प्रोफरी इत्यादि मूल्यवान दगडां-चीं केलेलीं पुष्कळ सुबक कामें होतीं, तीं सर्व उद्ध्वस्त करून टा-किलीं आहेत. सर्व मंदिरावर सोन्याचा मुलामा दिलेलीं कौलें पस-रलीं होतीं, परंतु तीं काढून घेऊन त्यावर आतां शिशाच्या धातुचीं कौलें घातलेलीं आहेत. ह्या ठिकाणीं एक पुस्तक ठेविलें असतें. त्यांत प्रेक्षक लोक आपलीं नांवें दाखल करितात. त्या संप्रदायानुरूप आह्मी आपलेंही नांव त्यांत लिहिलें. नंतर तेथून जसू आल्टर या नांवाचे देवालयांत गेलों. त्या ठिकाणीं सर्व स्थंडील सुवर्णाचें केलें होतें. तेथून कोर्सो या नांवाचे रस्त्यात गेलों; त्यांत पहिल्या प्रथम ट्रेजन राजानें बांधिलेलें फोरम दृष्टीस पडलें. या देवालयांत एक वि-

शाल स्तंभ आहे. ह्या मंदिराची जी ख्याती आहे ती तर कोणत्याही मंदिरांस येत नाहीं. **कान्स्टाटियस** नांवाचा बादशाह ज्या वेळेस या मंदिरांत आला, त्या वेळेस तो अगदीं स्तब्ध होऊन गेला. त्याच प्रमाणें **ग्रगरी धी ग्रट** या नांवाचा धर्मगुरु ज्या वेळेस या मंदिरांत शिरला, त्यावेळेस त्याला इतकें वाईट वाटलें कीं, अशा मंदिराचा कर्ता जो ट्रेजन, त्यास अधोगती मिळावी. त्यानें राजाकरितां परमेश्वराजवळ प्रार्थना करून त्याचा उद्धार केला. या प्रकारें या देवालयाची ख्याती आहे. वर जो विशाल स्तंभ सांगितला आहे, त्यावर **ट्रेजन** बादशहाचे इमारतींत घडलेली अनेक प्रसिद्ध कथानकें खोदलीं आहेत; त्यामध्यें एक सोपान परंपरा आहे व त्यावरून या मंदिराचे शिखरावर जातां येतें. शिखरावर **सेंटपिटर** या नावाचे साधुचा पुतळा विराजमान आहे. या पुढें **किरीनल** नांवाचे राजवाड्यांत असलेल्या जलोद्धारयंत्राकडे आम्ही गेलों. या राजगृहाची लांबी एकशें सत्तर फूट आहे. **क्यास्टर** आणि **पालाक्स** या नांवाचे दोन पुतळे येथें पाहण्यांत येतात. या राजवाड्याचे चारा कोनांवर चार भव्य जलोद्धार यंत्रें बांधिलीं आहेत. ह्या राजवाड्याचे जवळ युद्धप्रसंगाला दरबार भरविण्याचें ठिकाण आहे. **टरमिया** नांवाचे कारंजाचे तुषार उडत आहेतच; त्या तुषारांपासून संतुष्ट झालेला असा **मोझेस** याचा पुतळा जवळच आहे; व त्याचेच जवळ **डायाक्लीशन** नांवाचे बादशहानें बांधिलेलें स्नानगृह आहे. या स्नानगृहाचा परिघ दोन हजार यार्ड आहे व यांत दररोज तीन हजार पुरुषांचीं यथाविधीं स्नानें होत असत. हल्लीं हें स्नानगृह मोडून त्यांचें **सेंटमिरीयाडिग्लो** या नांवाचें मंदिर बांधिलें आहे. या नगरीचा इतका भाग पाहून आम्ही आपल्या भोजनगृहीं परत आलों. उपहार वगैरे केल्या-

नंतर दोन वाजून पंधरा मिनिटांनीं पुन्हां नगरी निरीक्षणार्थ बाहेर पडलों; रेलवे स्टेशना जवळील अगदीं नगरप्रांतीं असलेलें जलो-द्धारयंत्र पाहून प्रदर्शनार्थ उभारलेल्या इमारतीकडे वळलों. आपले-कडे प्रदर्शन ह्मणजे कपि ष्टीचा योग; परंतु तिकडील प्रांतीं सहा महिन्यांनीं, नाहीं तरी वर्षानें प्रदर्शन व्हावयाचेंच. ह्या प्रदर्शन मंदि-राजवळच न्याशनल ब्यांक आहे. पुढें व्हेनीस चौकामधून सेंटपॉल नांमक मंदिराकडे निघालों. जातांना सिस्टीअस बादशाहानें बांधिलेला मनोरा पाहण्यांत आला. हा एकशें सोळा फूट उंच आहे व पाया जवळ त्याचे प्रत्येक बाजूची लांबी १८ फूट आहे. जातांना टायबर नदी लागली. तीन वाजून तीस मिनिटांनीं सेंटपाल या ठिकाणीं दाखल झालों. प्रथम दर्शनीं दोन्ही बाजूस दोन साधूंच्या ह्मणजे सेंटपॉल आणि सेंटपिटर यांच्या स्फटिकाच्या भव्यमूर्ति दृष्टीस पडतात. या साधुद्वया-च्या हातांत 'नंदनवनाच्या किल्ल्या' दिल्या आहेत. आजपर्यंत होऊन गेलेल्या धर्मगुरूंच्या प्रतिमा मोझेक नांवाच्या दगडाच्या करून बसविल्या आहेत. ह्या मंदिराचे खांब संगमरवरी दगडाचे आहेत. इजिप्त देशच्या राजानें अर्पण केलेले असे आलाबास्टर नांवाचे बहुमूल्य पाषाणाचे स्तंभ तेथील स्थंडिलासभोंवतीं लाविले आहेत. मंदिराचे चारी बाजूस मिळून चौऱ्याशीं स्तंभमाला दाखविली आहे. आंतील रंगाचें काम फारच चांगलें आहे. नक्षीदार लांकडाची सर्व पटई केली आहे. त्या मंदिरांत दोन स्थंडिलें आहेत. तीं मर्क्-त नांवाच्या दगडाचीं केलीं आहेत. ह्या मंदिरास नवीन द्वार करित आहेत. मुख्य द्वारास मोरांच्या द्वादश पुतळ्यांची पंक्ति दृष्टीस पडते. याप्रमाणें हें मंदिर पाहून परत निघालों. वाटेंत कास्टान्झी नांवाचें येथील टॉलेजंग नाटकगृह लागलें. परंतु वेळ नसल्यामुळें आंत जाऊन

पाहण्याची इच्छा तृप्त करितां आली नाहीं. नंतर एकंदर अवलोकन केलेल्या पदार्थांचें मनन करित करित आश्रमीं आलों व अन्हिक सर्व उरकून उद्यां काय करावयाचें, काय काय पहावयाचें, या विचारांत असतां निद्रावश होऊन झोंपीं गेलों. प्रातःकाळीं मुखमार्जन इत्यादि विधी उरकून नगरनिरीक्षणास प्रारंभ केला. हा दिवस तेथील मोठा सणाचा होता. व्हिक्टर एम्यानूअल नांवाचे रस्त्यांतून सेंटएन्ड्र्यू नांवाचे मंदिराकडे आह्मी गेलों. त्या ठिकाणीं प्रसिद्ध इतालियन भव्य मॅमीयानीचा पुतळा दृष्टीस पडला. पुढें सेंटआंजेलो या नांवाचा एक पूल पाहिला. नंतर पुढें मॅडिकल आणि सर्जीकल कालेजें लागलीं हीं. कॉलेजें फारच मोठीं आहेत. सेंटपिटर नांवाचे चौकांत दहा वाजतां आलों. ह्या चौकांत सक्टस नांवाचे राजानें इजिप्तहून खांब आणिले होते, ते उभे केले आहेत. सेंटपिटर नांवाचे मंदिर फारच उत्कृष्ट व भव्य आहे. सेंटपिटरचें मंदिर सर्व जगांत मोठें आहे. या ठिकाणीं पिटर या नांवाचा धर्मगुरु आपल्या धर्माकरितां बळी पडला. या देवळास अनेक राजांनीं वेळोवेळीं बांधण्यास प्रोत्साहन दिलें; परंतु हें काम एक दोन मनुष्यांचे हयातींत होण्याजोगें नव्हतें. इ० स० १६२६ मध्यें साधारण काम कांहीं आटपल्यासारखें झालें; त्या वर्षी ह्या देवळामध्यें यथाविधी प्रार्थना वगैरे होऊं लागल्या. सत्राव्या शतकापर्यंत या मंदिरास खर्च १५ कोट रुपये लागला. दरवर्षी सुमारें दीड लक्ष रुपये याचे व्यवस्थेकरितां खर्च असन त्याचें क्षेत्रफळ १८ हजार चौरस यार्ड आहे. याची लांबी दोनशें बत्तीस यार्ड आहे. जमिनीपासून घुमट ४०३ फूट आहे व कळस ३९ फूट आहे. या मंदिरांत इतर उपमंदिरें पुष्कळ आहेत. एकंदर एकोणतीस स्थंडिलें येथें आहेत. जेवढे धर्म गुरु होऊन गेले, तेवढ्यांच्या येथें प्रतिमा आहेत. जवळच च्यापल ऑफ कौन्सील या नांवाचें


मंदिर आहे. त्यांत एक रौप्य स्थंडिल आहे व बर्नीनी नांवाचे कारागीरानें बांधलेलें पंचरसी धातूचें स्थंडिल फारच उत्तम आहे. ह्याच्या जवळ सेंटपिटरची बसावयाची खुर्ची जतन करून ठेविली आहे. तिचें वजन सुमारें १०९ टन आहे. मंदिराचे मध्यभागीं स्थंडिल आहे. ह्याच स्थंडिलावर धर्मगुरु पवित्र दिवशीं आरोहण करून प्रार्थना करतो. ह्याच स्थंडिलाजवळ पंचरसी धातूचा सेंटपिटरचा एक पुतळा आहे. तो ९९ फूट उंच आहे आणि त्याचें वजन ९३टन ह्मणजे सुमारें २७० खंडी आहे. ह्या पुतळ्याचे पायाचें चुंबन भाविकजन अनेक वेळां घेतात. नंतर आह्मी पोपोली या नांवाचे चौकांत आलों. या चौकांत इजिप्त देशांतून आणिलेले खांब ठेविले आहेत. त्याचेच उजवे बाजूस मिनिसियन नांवाचा एक बाग आहे. ह्या बागेंत तेथील राजाचा पुतळा आहे. सभोंवतालचा देखावा फार चांगला दिसतो. ह्या ठिकाणीं श्रीमान् लोकांकरितां एक मोठी फ्रेंच पाठशाला आहे स्पेनदेशचे वकिलांकरितां एक निराळाच महाल उठवून दिला आहे. आणखी कित्येक ठिकाणीं अवलोकन करून माघारां आलों. उपहार वगैरे करितों तों बारा वाजून गेले. जरा कांहीं वेळ आराम करून, पुनः तीन वाजण्याचे सुमारास बाहेर पडलों. नंतर सेन्टमेरीया ह्या मंदिरांत गेलों. त्या ठिकाणीं अलंकारास कांहींच कमतरता नव्हती. संगमरवर, आलाबास्टर, पोर्फिरि, मोझेक, या खेरीज इतर दगडांचें नांवच नको. येथील स्थंडिल पीत वर्णाच्या प्रस्तर स्तंभानीं अलंकृत केलें आहे. जिकडे तिकडे सुस्वर गाण्याचे रव कानीं पडत होते. त्याप्रमाणें पाहत पाहत कान्स्टांटाइन बादशहानें ज्या ठिकाणीं ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली, त्या ठिकाणीं आह्मीं आलों. हें ठिकाण १५०० वर्षांचें

जुनें आहे. ह्या ठिकाणीं तांबडे ग्रनाइटचे आठ स्तंभ उभे आहेत. ह्या बादशहानें मिस्किमियस नांवाचे मनुष्याचा वध केला व त्यानंतर रात्रीं त्यास स्वप्नांमध्यें एक त्रिशूळ दिसला व हीच आपल्यास साक्ष झाली, असें समजून त्यानें ख्रितीधर्म स्वीकारिला. ह्याच ठिकाणीं येशु ज्या शिडीवर पिडाला नांवाचे राजा समोर आणिला ती शिडी येथें दाखविली आहे. सर्व भाविक लोक ह्या शिडीवर गुडघ्यांनीं चढून जातात व दुसऱ्या शिडीनें खालीं उतरतात. हा विधी निर्विघ्नपणानें यथासांग ज्याचें हातून पार पडेल तो महापुण्यवान् अशी येथील लोकांचीं समजूत आहे. इतका भाग पाहून नंतर पांच वाजतां परत आलों. दुसरे दिवशीं म्हणजे नोवेंबरचें दुसरे तारखेस, पुनः बाहेर पडलों. त्या दिवशीं येथील पुष्कळ मंदिरें पाहिलीं, त्यांत कांहीं पुष्कळ जुनीं होतीं; परंतु काम फारच सुरेख होतें. ट्रजन बादशहानें बांधलेल्या फोरममध्यें सांपडलेलें अनेक खांब येथें दृष्टीस पडले. नंतर धर्मगुरूचा प्रासाद आह्मास लागला. तेथील पहारेकरी स्वीस लोक आहेत. राजसोपान परंपरा असून तिजवर कान्स्टानटाईन राजाची प्रतिमा बसाविली आहे. नंतर धर्मगुरूचे सिंहासन ज्या ठिकाणीं आहे त्या महालांत गेलों. जवळच धर्मगुरूचें खासगी प्रार्थनामंदिर आहे. ह्या मंदिरास प्रसिद्ध आंजेलो यानें रंग दिलेला आहे. येथील स्थंडिल सर्व मोत्यां-चें केलें आहे. नंतर त्याच वाड्यांत असलेली चित्रशाळा पाह-ण्यास गेलों. हजारों चित्रें दुतर्फा एकसारखीं लावून ठेवलेलीं आहेत. हीं चित्रें आहेत कां प्रत्यक्ष प्राणी आहेत? असा वारंवार संशय मनांत येतो. त्याचेच जवळ पोप महाराजांस अर्पण केलेली पुस्तकशाला आहे. येथील ग्रंथसमूह फारच नामांकित आहे. ग्रंथशालेचें अवलोकन करून, नंतर तेथील संग्रहालय पाहण्यास गेलों. येथें सर्व प्रकारचा संग्रह

आहे. परंतु कृत्रिम शिकारखाना आहे तो फारच प्रेक्षणीय आहे पृथ्वीवर देशोदेशीं जे पशू किंवा पक्षी आहेत, त्यांची चित्रें दगडांचीं खोदून येथें ठेविलीं आहेत. ह्याच वाड्यांत अनेक प्रकारचीं स्नानगृहें आहेत. दोन मल्ल एकमेकांशीं लढत आहेत असें दाखविलें आहे. जवळच एक प्रेतागार आहे; त्यामध्यें इजिप्त देशांतील कृतीनें राखलेलीं अशीं प्रेतें आहेत. इजिप्तमधील लोकांखेरीज ही कला दुसरे कोणास अवगत नाहीं. ह्याप्रकारें प्रेतें ठेविलीं असतां, कधींही कुजत नाहींत, त्यास दुर्गंधी येत नाहीं; परंतु कांहीं काळानें सर्व शरीर पांढऱ्या मेणासारखें बनतें. नंतर खिश्चयिन लोकांचे क्याटाकोम नांवाचे स्मशानभुमीकडे गेलों. ह्या ठिकाणीं मूर्तिपूजक लोकांपासून ज्यावेळेस छळ होत होता, त्यावेळेस लपून बसण्याकरितां केलेल्या पुष्कळ गुहा व त्यांतून मार्ग आहेत. ह्याप्रमाणें एवढ्याशा अवधींत पुष्कळ मुख्य भाग अवलोकन करून, परत आलों व पुढें फ्लारेन्स शहरीं जाण्याकरितां तिकिटें काढिलीं.

हें शहर पाहणारास आक्टोबर महिना फार सुखावह होतो. ह्यावेळीं येथें पारा ६२ अंशावर असतो. सर्व जमिन तापलेली असल्यामुळें जो पाऊस पडतो तो ताबडतोब जमिनींत जिरून जातो. नोव्हेंबर महिन्यांत पारा बहुत करून ५४ अंशांवर असतो. या महिन्यांत पाऊस बहुत करून १०।१२ दिवस पडतो. हा महिनाही प्रवासी लोकांस सुखकारक असतो. दिसेंबरमध्यें पारा बहुतेक ४७ अंशांवर असतो व पाऊस ११ दिवसांवर पडत नाहीं. ज्यानेवारींत पारा ४९ अंशांवर असतो. फेब्रुवारींत सुमारें ४६ अंशांवर असतो व सुमारें १० दिवस पाऊस पडतो. ह्या दोन महिन्यांत थंडी

फार असते. मार्चमध्यें पारा ५० अंशांवर असतो व पाऊस १०।११ दिवस पडतो. ह्या महिन्यांत वारा फार जोराचा वाहत असतो. मेच्या शेवटापासून आक्टोबरपर्यंत ऊन फार कडक पडत असतें. या महिन्यांत पारा ७० पासून ७५ अंशांपर्यंत चढतो.



फ्लारेन्स.

रोम शहराहून तारीख २ नोव्हेंबर रोजीं रात्रीं ११ वाजतां निघालों, ते दुसरे दिवशीं सकाळीं ६ वाजतां फ्लारेन्स येथें पोंचलों. इसवी सन १८६९ पर्यंत फ्लारेन्स हें टस्कनी नांवाच्या संस्थानाचें मुख्य शहर होतें; नंतर कांहीं दिवस खुद्द इटालीची राजधानी होतें. परंतु सांप्रतकाळीं हें फ्लारेन्स नांवाच्या इलाख्याचें मुख्य ठिकाण आहे. हें येथील धर्मगुरूचें आदिपीठ आहे व इटालीचें एक लष्कर ह्याठिकाणीं रहातें. पूर्वीपासून ह्याठिकाणीं पुष्कळ कारागीर उदयास आलेले आहेत; त्यामुळें रोम, व्हेनिस, नेपल्स इत्यादि शहरांच्या बरोबरीचें हें गणलें आहे. फार प्राचीन काळीं ज्याप्रमाणें 'रोम शहर राज्य-प्रकरणाचें आदिस्थान असे, त्याप्रमाणें फ्लारेन्स हें विद्येचें पीठ असे. इटालीयन भाषेमध्यें जो सध्यां ग्रंथसंग्रह दृष्टीस पडतो व जो सर्व-मान्य मानिला जातो; त्यांतील भाषा फ्लारेन्स मधील सभ्य लोकांचे बोलण्यांतीलच आहे. ह्याचप्रमाणें कलाकौशल्याचा उत्कर्ष हा ह्याच ठिकाणीं झाला. फ्लारेन्स शहराचा विस्तार विशेष नाहीं; परंतु इतक्या संकुचित प्रदेशांत येथें जे जे पदार्थ आढळतात व कलाकौशल्याचीं कामें दृष्टीस पडतात, तितकीं दुसऱ्या कोठेंही आढळत नाहींत; त्याचप्रमाणें ह्या शहराभोंवतीं असलेल्या बागांत उपनगरें फार रमणीय आहेत. फिझोली ह्या ठिकाणापासून ल्युका नामक पर्वताचीं नील वर्णाचीं शिखरें व सायंकाळचे सुवर्ण वर्ण आ-काशतारे ज्या वेळेस दृग्गोचर होतात तो वेळ तरी किती आल्हाद-दायक? जिकडे नजर फेंकावी तिकडे प्रत्येक गोष्टींत कुशलता परि-

पूर्ण दृष्टीस पडते. सरोवराच्या स्वच्छ पृष्ठभागावर ज्या-प्रमाणें एखादें श्वेतकमल दोलायमान होतें व सर्व भाग अलंकृत करितें, त्या प्रमाणें हें फ्लारेन्सनगर सर्व भागास शोभा आणितें. उंच शिखरावरून अवलोकन केलें असतां, फारच कुतुहलजनक भूप्रदेश दृष्टीस पडतो. गगन-समुद्रावर डोलकाठीप्रमाणें ज्याचें उंच शिखर आहे, अशा राजवाड्यापासून तों प्रार्थना मंदिराचे अद्भुत घुमटापर्यंत, स्पिनींच्या प्राचीन झोंपडीपासून तों थेट पिटी नांवाच्या राजवाड्यापर्यंत, फ्रान्ससिकॅन नांवाच्या उद्यानभूमिकेपासून तों थेट बयासिनच्या तटापर्यंत जिकडे तिकडे हें नगर पूर्ण सौभाग्ययुक्त दिसतें, फ्लारेन्समधील प्रत्येक रस्त्यांत ज्ञानाचा अगाध निधी सांठविला आहे, असें ह्मटलें असतां चालेल. जगांत ज्ञानपुष्पांची ही अमूल्य वटिकाच आहे. ज्या योगानें इटालीदेशास सर्व पृथ्वीस भूषण आलें त्याच कलाकौशल्यांत हें अग्रगण्य आहे. फ्लारेन्स शहरामधून नद्यांचा प्रवाह वाहत गेला आहे. ज्या दऱ्यांतून ह्या नद्यांचे प्रवाह वाहत गेलेले आहेत त्या पैकीं एका दरीचें शिखर १८६ फूट उंच आहे. येथील हवा-मान फारच विलक्षण व त्यांत एकदम फार फरक झालेला दृष्टीस पडतो. हिंवाळ्यांत हिंवाळा फार व उन्हाळ्यांत उन्हाळाही बराच असतो. इसवी सन १८६४ मध्यें इटालीची राजधानी ट्यूरीन शहर होतें; परंतु येथील लोकांनीं पुष्कळ खटपट करून तो मान आपल्या-कडे ओढून घेतला. ह्या मानाचा फायदा तर कांहीं त्यांस झाला नाहींच, पण फार खर्च पडल्यामुळें तिजोरींत तूट आली. बुद्धीच्या तरतरीविषयीं व केलेल्या अभिरुचिविषयीं फ्लॉरेंटाइन लोकांची ख्याती आहे व ह्याविषयीं त्यांनां फार अभिमान वाटतो आणि तें त्यांच्या वर्तणुकीवरून व पेहरावावरून स्पष्ट दिसून येतो. फ्लारेन्स शहर केवळ प्राचीन आहे. इसवी सनापूर्वी पहिल्या

शतकामध्यें हें शहर वसविलें असावें असा अदमास आहे. इसवी सनाचे १२ वे शतकापर्यंत ह्या शहराचा कोठेंही उल्लेख आढळत नाहीं; परंतु १२ वे शतकामध्यें जेव्हां फीझोला हें शहर उद्वस्त झालें, त्या वेळेस तेथील सर्व शहरवासी ह्या ठिकाणीं येऊन राहिले. पुढें व्यापाराच्या सोईमुळें व जलसामर्थ्यामुळें शहराची भरभराट फारच अल्पकाळांत झाली. येथील राज्यव्यवस्था रहिवाशी लोकांच्या प्रतिनिधींकडून होत असे. न्यायाचें काम तेथील सरदार लोकांकडे सोंपविलें होतें; परंतु त्या सरदार लोकांत वरचे-वर कलह होत असत, त्यामुळें शहराचें शांततेस धोका येईल, असें समजून लोकांनीं आपल्या संरक्षणाकरितां पुष्कळ सैन्य ठेविलें. इसवी सन १२५० या वर्षी सर्व यूरोपखंडांत फ्लारीन ह्या नांवाचें नाणें सुरू झालें. फक्त याच गोष्टीवरून फ्लारेन्स शहराचें व्यापारा-संबंधानें किती महत्व होतें, हें स्पष्ट कळून येईल. फ्लारेन्स मधील मुख्य महत्वाचे धंदे ह्मणजे लोंकर विणणें, कापडाचा व्यापार करणें, रेशमाचा व्यापार करणें, आणि सराफी, हे धंदे मुख्य मानिले होते. ह्या धंदेवाले लोकांचें इतकें महत्व वाढलें होतें कीं, राज्य कारभार व्यापारी लोकांनीं आपले तर्फे चालविला. सरदार लोकांविरुद्ध फार कडक कायदे केले व त्या कायद्यांची बजावणी ह्या लोकांनीं आपले स्वाधीन ठेविली. पुढें कांहीं काळानें हे कलह पुन्हां सुरू झाले. त्यांनीं कित्येक घराणीं देशहिताकरितां बाहेर घालवून दिलीं. पुढें आथेन्स येथील ड्यूक कांहीं दिवस गादीवर होता; परंतु त्यानें सर्व सत्ता आपल्या स्वाधीन ठेवण्याचा प्रयत्न केल्यामुळें, लोकांनीं त्याला हांकलून लाविलें. व्यापारी लोकांनीं राजसत्ता संपादन केलेली पाहून, खालच्या जातीच्या लोकांचे डोळे उघडले व कांहीं

तरी सत्ता प्राप्त व्हावी, याकरितां त्या लोकांनीं बंडें केलीं; परंतु ह्या वेळीं मेडिसी या नांवाच्या श्रीमान् व्यापारी पुरुषानें ह्या बंडखोर लोकांची बाजू घेतली. त्या लोकांनीं ह्या पुरुषासही आपला पुढारी कबूल करून; सर्व सत्ता त्याचे स्वाधीन केली. हा जो प्रथम मेडिसी सांगितला, त्याचा मुलगा फारच चांगला निघाला. त्यानें आपली सर्व संपत्ति विद्येला उत्तेजन देण्यांत, पुस्तकालयें व प्रार्थनामंदिरें बांधण्यांत खर्च केली. ह्या घराण्यांत इसवी सन १४६९ सालीं लॉरेन्झो या नांवाचा पुरुष गादीवर बसला. ह्यानें अल्पावकाशांत जी कीर्ति संपादन केली, ती फारच थोडी इतर ठिकाणीं आढळण्यांत येते. तो मोठा मुत्सद्दी कवि आणि विद्येचा पोशिंदा होता. ह्या राजाचा दरबार हा विद्येचें केवळ माहेरघर बनला. पुष्कळ पंडित ह्या राजाचे दरबारीं होते. ह्या राजाचे ठिकाणीं प्रजा इतकी अनुरक्त होती कीं, कोणीही राजा सिंहासनास योग्य ठरेना व लोकांनीं राज्यसत्ताच झुगारून देऊन लोकसत्ता स्थापित केली. ही गोष्ट १४९२ मध्यें झाली. हे लोकसतात्मकत्व फार दिवस टिकलें नाहीं. १४९८ मध्यें मेडिसी घराण्यांतील पुरुषांनीं पुन्हां आपली सत्ता मिळविली. पुढें कांहीं दिवसांनीं यांचे हातांतील सत्ता गेली; परंतु प्राशियाचे बादशहानें आपली मुलगी या घराण्यांत दिली होती, तेवढ्याकरितां त्यानें आपला आश्रय देऊन,ह्या घराण्यास पुन्हां राज्यावर स्थापीत केलें. इटालीमध्यें जीं प्रसिद्ध राजघराणीं होऊन गेलीं, त्यांत हें मेडिसी घराणें पहिल्या प्रतीचें होय. केवळ कलाकौशल्याला व विद्येला या घराण्यामुळें उत्तेजन आलें असें नाहीं, तर गरीब लोकांची स्थिती अर्थात शेतकी सुधारण्याकडे, ह्या राजाचें फार लक्ष होतें. पुढें ह्या घराण्यांत औरस वारस कोणी नसल्यामुळें, इतर राष्ट्रांनीं ह्यावर आपला डोळा ठेविला व पुष्कळांचे हातून निसटून हल्लीं इटाली संस्थानचा

एक प्रांत बनला आहे. आर्नो नदीच्या दोन्ही बाजूस फ्लारेन्स हें शहर वसलें आहे. उजव्या तटावर व्हीकेओ नांवाच्या पुलाचे उत्तरेस फ्लारेन्सीआ नांवाचें रोमन लोकांचें शहर होतें. शहराभोंवतीं जो पडका कोट दृष्टीस पडतो, तो सुमारें १२८९ पासून १३८८ यांचे दरम्यान बांधिला असावा. बहुतेक कोट उद्ध्वस्त केला आहे. परंतु त्यांतूनही जीं चांगलीं द्वारें होतीं, तीं महाप्रयासानें जपून ठेविलीं आहेत. त्यांपैकीं इसवी सन १२८४ मध्यें पोर्टालाक्रोस या नांवाचें नक्षिदार कमानीचें दार व पोर्टाऐसग्यालो नांवाचें दुसरें महाद्वार हीं फारच चांगलीं आहेत. अलिकडे शहर पुष्कळ वाढलें आहे. हा विस्तार आर्नोनदीच्या उजवे बाजूस फारच फैलावला आहे. शहरांतील मोठ मोठे पथिकाश्रम व मंदिरें ह्याच बाजूस आहेत. दोन्ही तटाकांचा संयोग करणारें प्राचिन असे ह्या नदीस सहा पूल आहेत. त्यापैकीं बरेच पूल नदीच्या पुरानें वाहून गेले होते; ते पुन्हां नवीन बांधिले आहेत. ह्या शिवाय आणखीं एक तारांचा पूल केला आहे. नदीचे दोन्ही बाजूंस भक्कम धक्के बांधिले आहेत; इ. स० १२३७ मध्यें सर्व रस्ते ईटबंदी बांधून काढिले होते; परंतु आतां ते फरसबंदी केले आहेत.

चहा वगैरे घेऊन सुमारें दहा वाजतां बाहेर निघालों. वर सांगितलेंच आहे कीं. फ्लारेन्स मधून आर्नो नदीचा प्रवाह जात आहे. आर्नो नदीस सहा पूल आहेत. त्यांतील एकाचें नांव ग्रॅझीके आहे. व ह्या पुलावर संगमरवरी दगडी पुतळे ठेविले आहेत. दुसरा पूल आहे, त्याचें नांव व्हिकायो हें आहे. ह्या पूलावर दुतर्फा दुकानांच्या रांगा लाविल्या आहेत. नदीचे पात्राबरोबरच लुंगार्नो

या नांवाचा रस्ता आहे. त्या मार्गामध्यें लाजीऑडीकोशी या नांवाचें एक वसतिस्थान लागलें. त्याच्या प्रथम दर्शनीं पुतळ्याचे दोन समुदाय दृष्टीस पडतात. त्यांतील पहिल्या समुदायांत पर्सस राजा मेडचूसा ह्याचा वध करितो आहे. व हर्क्युलीस प्रसिद्ध तद्देशीय भीमसेन हा सेंटार नामक राक्षसाचा नाश करितो, इत्यादि कथा भाग निर्दिष्ट केलेला आहे. दुसऱ्या समुदायांत एक सिंह, एक ससा जलोद्धार यंत्र व अश्वारुढ झालेला मेंडीसी नामक प्रसिद्ध पुरुषाचा पुतळा आहे. नंतर आह्मी काल्झायोली रस्त्यांत आलों. ह्या मार्गांत व्हिक्टर एम्युन्युएल याचा पंचरशी धातूचा एक पुतळा आहे. याच विथिकेंत मरोरोया नांवाचे संतिणीचें स्मारक ह्मणून बांधिलेलें देवालय आहे. आंतील भिंती व फरसबंदी सगमरवरी दगडांची आहे. ह्या मंदिरांतील घंटा ज्या मनोऱ्यांवर आहेत ते फार उंच आहेत. हें मंदिर बांधण्यास १५० वर्षें लागलीं. ह्या मंदिराचीं वातायनें भिन्न भिन्न रंगाचीं व फारच सुबक तऱ्हेनें भिंगें जडवून केलीं आहेत. ह्याच मंदिराचे सन्मुख सेंटजान यास बाप्तिस्मा झालेलें ठिकाण आहे. ह्या मंदिराचीं द्वारें पंचरशी धातूंचीं आहेत. तेथून प्याल्याझोआ युफेजी या नांवाचे सर्व संग्रहालयांत गेलों. प्रथम दर्शनीं अनेक पशुपक्षांचे पुतळे आहेत; अनेक प्रसिद्ध पुरुषांचीं थडगीं, बायझनटाइन पद्धतीवर काढलेलीं चित्रें, व प्रसिद्ध करुणरसाची मूर्ति निओनी ही एका बाजूस बसविली आहे. फ्लारेन्स येथें संगमरवरी दगडांचीं टेबलें करितात, तीं फारच प्रेक्षणीय असतात. तीं टेबलें येथें पुष्कळ आहेत. 'सुराधीश' जी मद्यप्यांची आराध्य देवता, हिचें चित्र एका बाजूस ठेविलें आहे; व विविधरंगाच्या खड्यानीं जडलेलें असें एक बायबल मधील शेवटचा निवाडा दाखविणारें चित्र आहे.

युफिशी पिक्चर संग्रह फारच चांगलें आहे. ह्या महालांतून राजवाडा व रमणबाग ह्यांचा उत्तम देखावा दृष्टीस पडतो. रायल पिक्चरग्यालरी फार प्राचीन व अलौकिक आहे. सेवेरस राजानें संपादन केलेल्या पुष्कळ कड्या एकसारख्या लावून ठेविल्या आहेत. सुगंधी द्रव्यांचें सांठवण करण्याकरितां मोठ मोठ्या सुरया तयार केल्या आहेत. त्याही फार नक्षीदार आहेत. ह्या संग्रहालयांतील सर्व तक्तपोशी नक्षांची असून तिला रुप्याचें पाणी दिलेलें आहे. असंख्य पुतळे जवळ बाजूस व एकंदर इमारतींत आहेत. त्यामध्यें जगांतील पहिला मनुष्यवध केलेला काढिला आहे. केन या नांवाचे मनुष्यानें आपल्या भावाचा वध केला व तें मृत शरीर तो मांडीवर घेऊन बसल्याचा देखावा दाखविला आहे. इतर संगमरवरी दगडांचे प्लास्टरचे आणि स्फटिकाचे अनेक पुतळे आहेत. याप्रमाणें येथील चित्रशाळा पाहून, विह्कीओ नांवाच्या राजवाड्याकडे आम्ही गेलों. ह्या जागेचा सार्वजनिक कामाकडे उपयोग केला जातो. ह्यांतही पुष्कळ चित्रें, पुतळे यांचा संग्रह आहे. तक्तपोशी फारच चांगली आहे. रेशमी जाळींचे नानावर्णांचे पडदे सोडिले आहेत. हरएक देशींचीं निशाणें व नाणीं ह्यांचा येथें संग्रह करून ठेविला आहे. नंतर आम्ही दोन वाजतां पुन्हां बाहेर निघालों, प्रसिद्ध इटालियन सेनाधिपति ग्यारीबॉल्डी याचा पुतळा पाहिला. तेथून आर्नो नदीवर असलेला पूल पाहवायास गेलों. त्याचे नजीक राजोद्यान आहे. राजोद्यानाचे शेतकरी लोकांकरितां पाठशाळा बांधलेली पाहिली. ह्या राजोद्यानामध्यें आपले कोल्हापूरचे श्रीछत्रपति सरकार राजाराम महाराज साहेब यांची समाधी दृष्टीस पडली. विलायतेहून स्वदेशीं परत येतानां या पुरुषावर मृत्यूचा घाला पडला. ही

मोह इ० स० १८७० मध्यें झाली. श्री छत्रपतीची समाधि पाहून आम्हांस भारीच खेद वाटला. कोठें जन्मभूमि व हें मृत्युस्थान कोठें? दैवगति विचित्र आहे. असो. उद्यानांतून फ्लारेन्स शहरचा देखावा मनोहर दृष्टीस पडतो.

तेथून पुढें सेंटमेरिया नांवाचे चौकांत गेलों. ह्या चौकांत सेंटामेरिया नांवाचें मंदिर आहे. आस्ट्रिया देशाचें इटाली देशाशीं युद्ध चालू होतें, ते वेळेस इटालीचे पुष्कळ लोक कामास आले; त्यांत एका शूर शिपायानें अतुल पराक्रम गाजविल्यामुळें त्याचें नांव अजरामर राहण्याकरितां, त्याचा एक पुतळा येथें बसविला आहे. फ्लारेन्सच्या इतिहासामध्यें नांवाजलेलें मेडिसी नांवाच्या घराण्याचें सन्मानार्थ एक देवालय आहे; त्यांत रंगीबेरंगी संगमरवरी दगडांचे व कांहीं नाना प्रकारचे ठिपके दिलेले पुतळे बसविले आहेत. त्यामुळें पुतळ्यांनीं शाली परिधान केल्या आहेत, असा भास होतो. तेथून सेंट मार्क नांवाच्या मंदिरांत पंचरशी धातूचा सुवर्णकांतीचा एक वराह बसविलेला पाहिला. ही मूर्ति पाहून आदिवराहाचे क्षमतेची कल्पना बांधितां येते. पुढें एका टेंकडीवर मायकेल ॲंजेलो या चित्रकाराचा पुतळा आहे. त्याच टेंकडीवर सेंटापिनोआटो याचे मंदिर व त्याचे पुढें विस्तीर्ण पटांगण आहे. टेंकडीवर जाण्याकरितां कुशलतेनें शृंगारिलेला मार्ग आहे. आफ्रिकन ग्रेनाइट नांवाचे दगडाचा खांब येथें उभारला असून, त्यावर न्यायदेवतेचा पुतळा बसविला आहे. इटाली देशामध्यें पुष्कळ प्रकारचीं धान्यें, फळें व खनिज पदार्थ सांपडतात. समुद्रांतील शिंपांचे अनेक प्रकारचे अलंकार करणें हा येथील कारागीरांचा धंदा होय. ह्या शहराहून इलेट्रिकट्राम मधून फिजोली गांवांत गेलों. फिजोली हे खेडेंगांव आहे व हें एका उंच टेंकडिवर वसलें आहे.

येथील हवेंत नेहमीं फरक होत असल्याकारणानें अशक्त मनुष्यास हवा मानवत नाहीं. एप्रीलपासून जूनच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत व सपटंबर, आक्टोबर आणि नोव्हेंबर या महिन्यांत येथील हवा चांगली असते. हिंवाळ्यापासून तों वसंत ऋतूच्या आरंभा पर्यंत कधीं कधीं फारच थंड वारा सुटतो. जुलई व आगष्ट या महिन्यांत ऊन फार कडक पडत असतें.

व्हेनीस.

तारीख ९ नोव्हेंबर रोजीं फ्लारेन्स येथून दिवसां अडीच वाजतां निघालों तें बलोन येथें संध्याकाळीं सहा वाजतां गाडी बदलावी लागली. व्हेनीस शहरास रात्रीं अकरा वाजतां पोंचलों.

इ. स. ८०९ ह्या वर्षी शालनमन राजाचा मुलगा पेपीन यानें लागून नांवाच्या बेटावर स्वारी केली असतां, या बेटामध्यें अनेक संस्थानचे लोक जमले होते; परंतु हीं संस्थानें एकत्र झाल्यामुळें पेपीन राजाचा कांहीं इलाज न चालतां, त्यास परत जावें लागलें. वर सांगितलेलीं संस्थानें ह्मणजे थिवाल्टो, मालानोको, आणि होर्सेलो हीं होत. ज्यावेळेस पेपीनच्या स्वाऱ्या बंद झाल्या त्या वेळेस अर्थात् हीं बेटें आपला कारभार पाहण्यास लागलीं. व सर्वांनीं रिव्हाल्टो ही जागा पसंत केली. बायझांटाईन आणि फ्रोकोनाईन ह्या दोन पादशाहीमध्यें हें शहर बसल्या कारणानें व्यापारासंबंधानें हें फारच महत्वाचें झालें. त्यांतून पूर्वेकडील ह्मणजे आपलेकडील व्यापाराच्या सोईचें असें हेंच शहर होतें; त्यामुळें फारच थोड्या अवकाशांत या शहराची भरभराट झाली. तिकडील प्रदेशामध्यें ह्या शहराला जें वर्चस्व प्राप्त झालें तें एनरीकोडोलो हा राजा गादीवर असतां मिळालें. बहुतेक अॅड्रीआटिक समुद्र, भूमध्य समुद्र व पुष्कळ ग्रीक लोकांचीं बेटें या लोकांनीं काबीज केलीं. ह्या झटापटीमध्यें पुष्कळ सरदार लोक उदयास आले. त्यांचा एक निराळा दरबार झाला व ह्या दरबारांत सर्व राजकारणी गोष्टींचीं खलबतें होत होतीं. कांहीं दिवस मुख्य सत्ता तेथील राजाचे

हातीं होती; परंतु ह्या सरदार लोकांनीं ती आपल्याकडेसच ठेविली. जिनोवा शहर व्हेनिस शहरचें प्रतिस्पर्धी होतें. ह्या दोन शहरां-मध्यें कलह होत असत व त्यामुळें व्हेनिस शहराचे बरेच प्रांत जिनोई लोकांचे ताब्यांत गेले; परंतु इ. सन १३५२ सालीं व्हेनिस संस्थानानें जिनोई लोकांचा अगदीं पराभव केला. ज्या वेळेस स्वतःचा मार्ग खुंटला त्या वेळेस जिनोई लोकांनीं पाडुआ, हंगेरी, नेपल्स आणि वेरोना या शहरांनीं एकत्र जमून व्हेनिसचे विरुद्ध कट केला. इ. स. १३७९ मध्यें जिनोई लोकांनीं व्हेनिस पैकीं एक शहर काबीज केलें; परंतु ह्या प्रसंगीं देखील हा जय फार वेळ टिकला नाहीं;कारण व्हेनिशियन लोकांनीं जिनोई लोकांचा पराभव करून त्यांना तह करण्यास लाविलें. पुढें पुष्कळ ठिकाणीं व्हेनिशियन सैन्यास जय मिळत गेला. थोड्याच अवकाशांत पो नदी पासून कार्फ्यु बेटापर्यंत या संस्थानाची हद्द पसरली.

इ० स० १४८३ मध्यें क्रीटीया नांवाचें बेट या लोकांचे हस्तगत झालें व १४८९ मध्यें सायप्रस बेटही यांचे हा-तांत आलें. पंधरावे शतकामध्यें तर व्हेनिसचें बेट अगदीं शिखराला जाऊन पोंचलें, त्या वेळेस येथील व्यापार फार भरभराटींत होता, लोकसंख्या दोन लक्षांवर होती. बाहेर गांवीं व्यापार एक कोट लक्षांचा होता. सत्तर पैकीं चाळीस निव्वळ नफा राहत असे.त्या वेळेस येथील आरमार फार जय्यत होतें. मोठ-मोठ्या खोल दर्यांत जाण्यासारखीं अशीं व्हेनियसजवळ मजबूतजहाजें होतीं; व त्यावर हजार नाखुदे होते. ह्याखेरीज तीन हजार बारीक गलबतें असून त्यावर सत्रा हजार लोक होते. ह्या सर्वांपेक्षां बळकट अशीं गलबतें होतीं. हीं जहाजें इतकीं मोठीं असत कीं,


त्यावर अकरा हजार लोकांचा समावेश होत असे; परंतु कोणाचेंही वैभव, किती वेळ टिकणार. राहून राहून आपली चंचलता सर्वांच्या लक्षांत ठसविण्याचा लक्ष्मीचा नेहमींचाच क्रम आहे. त्या क्रमालाच अनुसरून ह्या शहराचे वैभवास उतरती कळा लागला. पूर्वकडे ह्या शहराचा दरारा होता, त्याचे मूळ कान्स्टांटिनोपल हें शहर होतें. परंतु तुर्की लोकांनीं व्हेनिस लोकांपासून हें शहर जिंकूनघेतलें. परंतु अजून व्हेनिसचा व्यापार हिंदुस्थानाशीं चालू होता, व त्यामुळें सर्व व्यापाराचें व्हेनिस अगदीं नाक बनलें होतें. परंतु पुढें ज्या वेळेस हिंदुस्थानाला समुद्रांतून रस्ता शोधून काढिला, त्यावेळेस मात्र हा व्यापार अजिबात फसला. एकदां ग्रह फिरल्यावर मनुष्याचा काय पाड? ह्याप्रमाणें पंधरावें शतकांत हिंदुस्थानाला नवीन मार्ग शोधून काढिल्यामुळें व्यापाराचें महत्व कमी झालें. सोळावें शतक निघण्याचा अवकाश तों पुनः अनेक ठिकाणीं व्हेनिसला मागें फिरावें लागलें. ज्या प्रमाणें पूर्वी एकामागून एक जय मिळत गेले, त्याचप्रमाणें एकामागून एक अपजय होत गेले. ह्या संस्थानचा उत्कर्ष इतरांस सहन न झाल्यामुळें सर्वांनीं ह्याचा अगदीं मोड करून टाकला. ह्या लढायांमध्यें व्हेनीसनें आपला अतुल प्रताप अनेक वेळां गाजविला. ह्या वेळेपासून पुढें इतिहासामध्यें व्हेनिस असून नसल्यासारखें झालें. व्हेनिसचे ताब्यांत ह्या वेळेस केवळ इटालीचा उत्तम भाग होता, फ्रान्स देशामध्यें जी मोठी राज्यक्रांति झाली, त्यावेळेस नेपोलियन बादशहानें आपल्याला सामील होण्याविषयीं पुष्कळ पुष्कळ बोलणें लाविलें; परंतु व्हेनिसनें त्याचें बोलणें मान्य केलें नाहीं. त्यामुळें ह्या फ्रान्सचे सिंहाचें पित्त खवळून गेलें व इसवी सन १७९७मध्यें हें शहर त्यानें आपले ताब्यांत घेतलें, ह्याप्रमाणें व्हेनिसला प्रायश्चित्त भोगावें लागलें. पुढें हजारों राजकारणांमुळें आज आस्ट्रि-

याचे ताब्यांत; उद्यां टर्कीच ताब्यांत, असे होतां होतां इसवी सन १८४८ मध्यें व्हेनिसनें आपल्याला स्वतंत्र ह्मणविण्यास प्रारंभ केला. परंतु हें इटालीला न खपून अठरा महिने ह्या शहराला वेढा घातला व इटालीमध्यें त्याचा समावेश केला. ज्याप्रमाणें वरील त्रोटक इतिहासामध्यें इतर सर्व राष्ट्रांपेक्षां व्हेनीस स्वतंत्र होतें, त्याप्रमाणें कलाकौशल्यामध्येंही हें स्वतंत्र होतें. इटालीचें सर्व भाग जरी आपण फिरून आलों, तरी हें शहर व त्यांतील कलाकौशल्य पहावेसें वाटतें. येथें जीं स्मारकें दृष्टीस पडतात, त्यावरून आपल्याला असें स्पष्ट दिसून येईल कीं, या शहराचें सुकाणूं आपले इकडील देशावर अवलंबून होतें. सेंटमार्क हें देवालय बाइझंटाइन पद्धतीवर बांधिलें होतें. गॉथिक पद्धतीवर जीं ह्यानें कामें केलीं आहेत, तींत तर ह्या लोकांनीं पुष्कळ फेरफार केला आहे. ही आपली करामत व्हेनिसियन लोकांनीं उत्तरेकडील राजवाड्यांत दाखविली आहे. या दोन पद्धतीमध्यें विशेष फरक ह्मटला ह्मणजे खालीं लिहिल्याप्रमाणें होय. मुख्य दर्शनीं भागावर स्तंभांची रांग असून मध्यंतरीं एक दार असतें. वरील मजल्यावर एकासएक लागून खिडक्या असतात. दोन्हीं बाजूस मोठमोठीं पांखीं काढिलीं असतात व तीं अनेक रंगांनीं रंगविलेलीं असतात. विशेषतः फरक म्हटला ह्मणजे अनेक प्रकारचे रंग देऊन भूप्रदेश अलंकृत करणें हा होय. चित्रकलेमध्यें निष्णात असे अनेक कुशल कारागीर येथें प्रसिद्धीस आले. त्यापैकीं लासर्डी या नांवाच्या घराण्यांतील पुरुष फारच विख्यात होते; हे शिल्पशास्त्रासंबंधें झाले; परंतु खोदीव काम करण्यासंबधीं मसीन या नांवाचे मनुष्यापेक्षां निपूण असे दोघे भाऊ होते. ह्याच सुमारास लोकांची गोडी उत्तम थडगीं करण्याकडे लागली. आज जीं हजारों थडगीं दृष्टीस पडतात, त्याचें कारण तरी हेंच होय. पुढें १५२७ मध्यें

जॅसोपोन्सोन्हिनो या नांवाचा पुरुष नांवाजला गेला व त्याच्या कांहीं कांहीं कृती मायकेल आँजेलो याच्यापेक्षां सुबक व रमणीय होत्या; परंतु व्हेनिस मधील कारागीर पादुआ वगैरे शहरीं गेले व ते सर्व कला तेथून शिकून आले. पुढें १४७२ मध्यें आईल पेंटिंगचा ह्या शहरामध्यें प्रवेश झाला. ह्या रंग देण्याच्या कलेचें जेव्हां लोकांनीं परिशीलन केलें, तेव्हां मग जें बहादरीचें काम झालें तें अजून जसें-च्या तसेंच दिसत आहे. कांहीं रंगित पुतळे तर प्रासादिक आहेत असें वाटतें. मनुष्य कोटीला तीं भूषणें होत व जोंपर्यंत कलाकौश-ल्याची प्रीति लोकांमध्यें राहील तोंपर्यंत या शहरांना जें सौभाग्य आहे तें कायम राहील, ह्याप्रमाणें व्हेनिस शहरचे कलेचा उदय कसा झाला ह्याचें संक्षिप्त वर्णन केलें, परंतु हें शहर सर्व युरोपमध्यें एका विशेष-कारणामुळें अद्वितीय बनलें आहे. त्याची प्रतिमा इतरत्र कोठेंच आढळत नाहीं. ते विशेष कारण ह्मणजे हें कीं, येथील चांगलीं गणिलीं जाणारीं मंदिरें १९००० व खासगीं गृहेंहीं ११७ बेटांवर विराजमान आहेत. हें शहर समुद्रकिनाऱ्यावर आहे; व एक मोठा कालवा शहरामध्यें खणून नेला आहे; त्या कालव्याचे पाट सर्व शहरामधून खेळविले आहेत, व त्याचे योगानें जलरेखानियमित असे त्या नगरचे ११७ विभाग झाले आहेत. असे एकंदर कालवे १९० आहेत व त्यास ३७८ पूल आहेत. अशा प्रकारचे देखावे फारच थोडे ठिकाणीं दृष्टी-स पडतात. आतां शहराला स्वस्थतेनें उपभोग घेण्यास सांपडल्या-मुळें कांहीं अंशीं पूर्वीचें स्वरूप ह्यास प्राप्त होत आहे. शहराभों-वती एक भक्कम तट आहे. समुद्राचें पाणी आंत न शिरावें ह्मणून समु-द्राला मोठ मोठे धक्के कितीएक मैलपर्यंत बांधिले आहेत. ज्या वे-ळेस भरती येते त्या वेळेस सर्व शहरांत जिकडे तिकडे मोठी मौज दृष्टीस पडते. कालव्यांतून लहान लहान होड्या जाण्याकरितां

नेहमीं तयार असतात; ज्याप्रमाणें इतर ठिकाणीं अश्वरथ, त्या-प्रमाणें ह्या ठिकाणीं नौका तयार असतात. ह्या बोटींना 'गोंडाला' हा तद्देशीय शब्द आहे; त्यांचा एके ठिकाणीं अड्डा नसून शहरांत सर्वत्र शाखा पसरल्या आहेत. ह्या सर्वांना नाना तऱ्हेचे रंग दिलेले असतात; ह्या नाना प्रकारच्या आकृतींच्या असतात. शहरची हवा चांगली आहे; त्यांत विषेश गोष्ट ही आहे कीं, ह्या शहरांत जलमार्गांमुळें धुरळा मुळींच दृष्टीस पडत नाहीं; त्यामुळें आरोग्याला ह्या ठिकाणीं फार फायदा होतो.

हवामानः—व्हेनीस शहराची हवा समुद्रामुळें उत्तम असते. ज्यानेवारी महिना फारच थंड असतो. ह्या वेळीं पारा ३७ अंशांवर असतो. फेब्रुवारी महिन्यापासून मे अखेरपर्यंत ४१ पासून ६५ अंशांपर्यंत पारा चढत जातो; जूनपासून आगष्ट अखेरपर्यंत ७७ अंशांपर्यंत व सप्टेंबरपासून डिसेंबर अखेर ४० अंशांपर्यंत पारा उतरतो.




जिनीव्हा.

व्हेनीसहून तारीख १० रोजीं दोन प्रहरीं २-१९ वाजतां **जिनीव्हा** येथें जाण्यास निघालों. गाडींतून **व्हेरोना** शहराचा सुंदर देखावा दृष्टीस पडला. **व्हेरोना** शहर हें याच नांवाच्या प्रांताचें मुख्य ठिकाण आहे. येथें **इटालीचें** ६००० सैन्य असतें. हें शहर **एडीज** नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर वसलें आहे. ह्या नदीवर ६ पूल बांधीले आहेत. इ. स. १८१४ मध्यें हें शहर **आष्ट्रीय** लोकांच्या ताब्यांत होतें. ह्या वेळीं ह्याही शहरांस तटबंदी केली. इ. स. १८६६ या वर्षी हें शहर **इटालीस** परत मिळालें. हें शहर अद्यापि पहिल्या प्रतीच्या किल्ल्यांत गणलें जातें.

पुढें **मिलन** येथें ७३-० वाजतां संध्याकाळीं दाखल झालों. येथें गाडी बदलावी लागली. तेथून ८-१९ वाजतां निघालों ते **ट्यूरीन** येथें ११-१९ वाजतां पोंचलों. येथेंही गाडी बदलावी लागली. **मोडेन** येथें २ ४९ वाजतां पोंचलों. येथें गाडी बदलावी लागते व कस्टम हाऊस [नाकें जकातीकरितां] मध्यें सामान तपासण्याकरितां उतरावें लागतें. **कालोनला** ९-५९ वाजतां पोंहलों; येथें गाडी बदलून **जिनीव्हा** येथें सकाळीं ८-१९ वाजतां पोंचलों. श्रीमंत सरकार **महाराज** साहेब यांचा मुक्काम येथेंच होता. श्रीमंत **महाराज** साहेबांचें दर्शन दोन प्रहरीं झालें. ह्या योगानें प्रवासाचे सर्व श्रमांचा व रात्रीचे जागरणाचा सर्व परिहार होऊन, तो दिवस माझे आयुष्यांतील अत्यंत आनंदाचा आहे, असें मला वाटलें.

जिनीव्हा हें शहर स्वीट्झरलंड देशांतील सर्वांत मोठें व संपत्तिवान् शहर आहे. हें शहर सरोवराच्या दक्षिण टोंकाला जेथें ऱ्होन नदी मोठ्या वेगानें जिनीवाच्या सरोवराला मिळते तेथें बसलें आहे. ऱ्होन नदीच्या योगानें या शहराचे दोन भाग झाले आहेत. इ. स. १८५० मध्यें या शहराची तटबंदी पाडून टाकिल्यामुळें दिवसेंदिवस हें शहर मोठें होत चाललें आहे. नदीच्या योगानें शहराचे झालेले दोन भाग ८ पुलांनीं जोडले आहेत. सर्वांत उंच व सुंदर पॉनड्यू मॉन्ट ब्ल्यॉक नांवाचा पूल २८० यार्ड लांबीचा आहे. जिनीव्हा हें घड्याळें व जवाहीर यांजविषयीं फार प्रसिद्ध आहे. जिनीव्हाचें सरोवराची लांबी २५ मैल आहे. क्षेत्रफळ सुमारें २२५ मैलआहे. याची आकृति अर्धचंद्राकार आहे, या सरोवरांतील पाण्याचा रंग निळा आहे. यांत नाना तऱ्हेचे पाण्यांतील पक्षी असतात. येथें श्रीमंत सरकार महाराज साहेब याहीं घड्याळाचें काम शिकण्याकरितां एक विद्यार्थी ठेविला आहे. श्रीमंत महाराज साहेबांच्या आज्ञेनुरूप ब्यारिस्टर होण्याकरितां व प्यारीस शहर पहाण्याकरितां तारीख १३ नोव्हेंबर १८९४ रोजीं आज्ञा घेऊन निघालों.



प्यारीस.

जिनीव्हा येथून ता. १३ रोजीं ८।२० वाजतां निघालों, तें फ्रान्स देशाची राजधानी प्यारिस या शहरीं ता. १४ रोजीं सकाळीं ७ वाजतां पोंचलों. ह्या शहरचें प्रत्यक्ष वर्णन देण्याचे पूर्वी आपण ह्या शहराचे कलाकौशल्य वगैरे ह्यांचा क्षणभर विचार करूं. सुधारणेच्या शिखरास युरोप खंडांतील जे देश जाऊन पोंचले आहेत; त्यापैकीं फ्रान्स देशाची पाहिले वर्गांत गणना होते. पृथ्वीचे पाठीवर ह्या देशांतील लोकांप्रमाणें उपद्व्यापी (खटपटी) व सुखाभिलाषी लोक दुसरे कोणतेही नाहींत. कोणतेंही धाडसाचें काम करावयाचें ह्मणजे त्या ठिकाणीं पहिली उडी फ्रेंच लोकांचीच पडावयाची. अचाट बुद्धिबल आणि कलाकौशल्य यांचा याच लोकांना जगदीशानें मक्ता दिला असावा, असें प्रत्येकास वाटतें. अमेरिकन लोक ह्यांची बरोबरी करतील, किंबहुना कांकणभर ह्यांचेपेक्षां त्यांचें पाऊल पुढें पडलें असेल; परंतु त्यांचे व्यवसायाची दिशा अगदीं भिन्न आहे. ज्याप्रमाणें फ्रेंच लोक रात्रंदिवस धाडसाचें धनुष्य, वर उद्योगाचा बाण सज्ज करून, सुखाची पारध करीत आहेत, त्याप्रमाणें अमेरिकन लोक मनुष्याचे व्यवहारिक सुखाचा पाठलाग करीत आहेत असें दिसेल. फ्रेंच लोकांची प्रवृत्ति विशेष रंगेल; जणुं काय संकट येऊन पोंचलें नाहीं; तोंपर्यंत केवळ विलासांत दंग असण्याखेरीज दुसरा मानवी जातीस परमेश्वरानें उद्योगच लावून दिला नाहीं. असें त्यांचे वर्तनावरून वाटतें; परंतु संकट अगदीं येऊन ठेपलें असतां, सर्व राष्ट्रांत आपली

मानखंडना होणार असें आढळून आल्यावर मग काय विचारणें. वाघाचे दरींत शिरून, वाघिणीचा बच्चा घेण्यास पुढें हात करण्यास वाघीण असतांही इतकी भीति नाहीं, इतकी फ्रान्स देशाचे शत्रूची दाणादाण उडून जाते. त्यांनींच काय परंतु आणीबाणीचे प्रसंगी फ्रेंच स्त्रियांनींही दाखविलेलें शौर्य मनास अगदीं थक्क करून सोडतें. ज्याप्रमाणें सुखाची बळवत्तर इच्छा या लोकांमध्यें जागृत आहे, त्याप्रमाणें स्वातंत्र्य प्रीतिमुळें ह्या देशांत राज्यक्रांतिही अनेक वेळां झालेली आहे. त्या प्रसंगाचें थोडेसें दिग्दर्शन करून नंतर शहरचे वर्णनास प्रारंभ करूं.

फ्रान्स देशाचें ऐतिहासिक बाह्यरूप.

यूरोपांतील देशांचा फार प्राचीन इतिहास ह्मणजे त्या देशाचा वृत्तांत प्रसिद्ध रोमन पादशाहीस नेऊन मिळविणें हा होय. त्याप्रमाणें पाहूं गेलें असतां, रोमन देशाचे विजयाची लाट सोसाट्यानें वाहत असतां, अनेक देशांचे किनाऱ्यांवरून फ्रान्स देशावर आपटली. रोमचा प्रसिद्ध धनुर्धर ज्युलिअस सिझर ह्यानें इसवी सनापूर्वी सुमारें पन्नास वर्षांचे मागें हा देश काबीज केला. आपली सत्ता तेथें स्थापित करून रोमन वीर आपले देशीं निघून गेल्यावर, दुसरी सांगण्यासारखी गोष्ट झटली ह्मणजे, ह्या देशामध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रवेश ही होय. ख्रिस्ती धर्माचा प्रचार ह्या देशांत सेंटडेनसीस नांवाचे पुरुषानें इ० स० २५० ह्या वर्षी केला. रोमन पादशाही रोममध्यें रसातळास गेली, त्यामुळें इतर ठिकाणींही तिचा टिकाव लागला नाहीं; आणि सरते शेवटीं पांचवे शतकामध्यें टूर्ने येथील राजा

क्लिव्हरिक यानें **रोमन** लोकांस हांकून देऊन आपण राजा बनला. ह्याप्रमाणें **रोमन** लोकांचे ताब्यांतून हा देश तद्देशीय लोकांचे ताब्यांत गेला. राज्यक्रांति होण्याचे पूर्वी ह्या देशांत पांच प्रसिद्ध घराणीं होऊन गेलीं. त्यांतील पहिलें **मेरोव्हिंजियन** नांवाचें होय. दुसरें घराणें **कार्लोविंजियन** होय. हें घराणें राज्य करीत असतां, **नार्मन** लोकांनीं त्या देशावर स्वाऱ्या केल्या. परंतु राजे अति दुर्बल असल्यामुळें व देशाचें संरक्षण त्यांजकडून होत नाहीं; अशी लोकांची खात्री झाल्यावर ह्या घराण्यांतील शेवटचा राजा दुसरा **चार्लस**, ह्याला ८९७ त पदच्युत करून राज्य लक्ष्मीनें शहराचें रक्षण करणारा व **नार्मन** लोकांचा पराजय करणारा, **काउंट आडो** ह्याचे गळ्यांत माळ घातली. हाच पुरुष **कॅपिशियन** घराण्यांतील पहिला होय. हें घराणें सन ९८७ पासून १३२२ पर्यंत राज्यावर होतें. ह्या घराण्यांतील शेवटचा पुरुष चवथा **चार्लस**, ह्यास कांहीं संतान नसल्याकारणानें, चवथे प्रसिद्ध **व्हेलाय** ह्या नांवाचें घराणें गादीवर बसलें. हें घराणें १३२८ पासून १५८८ पर्यंत होतें. नंतर **बुर्बोन** ह्या नांवाचें घराणें राज्यारुढ झालें. तें इ. स. १५८८ पासून १७८९ पर्यंत टिकलें. नंतर फ्रान्स देशाचे इतिहासाची फार दिवस बदलत असणारी दिशा लोकांचे पुढें उभी राहिली. हीं जीं पांच घराणीं झालीं, त्यामध्यें पुष्कळ राजे दुर्व्यसनी, जुलमी व मूर्ख असल्यामुळें पैशाची केवळ उधळपट्टी होत असे. श्रीमंत लोकांचे घरीं सोन्याचा धूर निघे, परंतु हजारों गरीब लोकांना उपासमार पडत असत. क्षुधेमुळें लोक दीन होऊन रस्तोरस्तीं भटकत फिरत. त्यांतूनही प्रजेवर कराचा बोजा केवळ तिचे शक्तिबाहेर व त्या कराचा उपयोग केवळ राजघराणें, श्रीमंतलोक ह्यांचे चैनीकडे

होत असल्यामुळे ती गोष्ट लोकांना डांचूं लागली व प्रजारक्षणाचें काम राजाकडून काडीमात्रही होत नाहीं, अशी लोकांचा खात्री झाली, त्यांत त्यावेळच्या विद्वान् लोकांचे ग्रंथांची भर पडली. त्या ग्रंथामध्यें राज्य केवळ प्रजेचें हिताकरतांच आहे असें त्यांनीं सप्रमाण सिद्ध करून दाखविलें. अशा प्रकारचा लोकांचा जो ग्रह बनला, त्याचें उत्कृष्ट स्वरूप सन १७८९चे राज्यक्रांतीचे रूपानें बाहेर पडलें. स्वतंत्रता देवीचे भयंकर स्वरूप जें त्यावेळीं दृष्टीस पडलें, त्याप्रमाणें पुढें फारसें आढळत नाहीं. त्या लोकांनीं त्यावेळचे राजांस देहांत शासन देण्यासही मागें पुढें घेतलें नाहीं. ही गोष्ट सन १७९३ मध्यें घडली; व लागलेंच ह्या स्वतंत्रता भक्तांनीं प्रजासत्तात्मक राज्याचा पाया त्या वेळेस घातला. परंतु हा पाया ह्याच वेळेस अगदीं भक्कम बसला नव्हता, असें आढळून येतें. कारण ह्याच सुमारास फ्रान्स देशाचे रंगभूमिवर एक अद्वितीय पुरुष चमकूं लागला. आणि सर्व प्रेक्षकांची चित्तवृत्ति इतकी त्याचे आधीन झाली कीं; तथ्यातथ्य विचार न करितां सर्व ठिकाणीं प्रजा त्यास अनुमोदन देऊं लागली व प्रजेनें सरते शेवटीं अगदीं राजी होऊन, ह्या पुरुषास राजा कबूल केलें. हा पुरुष नेपोलियन बोनापार्ट होय. हें सांगितल्यावांचून आमचे सूज्ञ वाचकांचें लक्षांत आलेंच असेल. नेपोलियन इ. स. १८०४ ह्या वर्षी बादशहा झाला. परंतु कालचक्राचे सपाट्यांतून कोणी सुकतो? ज्या वेळेस काळ फिरला त्या वेळेस अठरा राष्ट्रांना एकटा झुंजविणारा जो नेपोलियन त्यास राज्य सोडून एल्बा बेटांत पळून जावें लागलें. इकडे त्याचे पश्चात् अठारावा लुई गादीवर बसवून प्रजेनें केलेल्या राजहत्येच्या पापाचें प्रक्षालन केलें. ज्याप्रमाणें १७८९ मध्यें राज्यक्रांति झाली, त्याप्रमाणें आतां म्हणजे १८१४ स

राज्यावृत्ति झाली. परंतु ही राज्यावृत्ति फार दिवस टिकणारी नव्हती. कारण १८३० मध्यें जुलई महिन्याचे २७।२८।२९ या तीन तारखांपर्यंत जें बावटळ उसळलें, त्यामुळें आगष्ट महिन्याचे सातवे तारखेपर्यंत ह्मणजे लुई फिलिप राजा गादीवर येईपर्यंत प्रजासत्तात्मक होतें. फिरून इ. स. १८४८ च्या फेब्रुआरी महिन्यांत राजक्रांति होऊन प्रजासत्तात्मकत्व स्थापित झालें, तें १८५२ पर्यंत टिकलें. पुढें १८५२ पासून १८७० पर्यंत राज्यसत्तेचा दुसरा भाग संपला. आणि १८७० मध्यें प्रजासत्तात्मकत्व स्थापित झालें. परतु ह्या वेळेस फ्रान्स देशावर एक अति दुर्घट संकट ओढवलें. फ्रांन्स आणि जर्मनी ह्या दोन देशांमध्यें कलह उत्पन्न होऊन, जें भयंकर रण माजलें, त्यांत फ्रेंच लोकांचा अगदी मोड होऊन जर्मन लोकांनीं खुद्द प्यारीस शहराला वेढा घातला. त्यांचा सर्व प्रयत्न अगदी निष्फळ झाल्यावर, ह्या लोकांस शरण जाण्याखेरीज दुसरा मार्गच उरला नव्हता. ह्या युद्धामध्यें जर्मनांनें मागितलेली अफाट खंडणी ह्या लोकांनीं इतक्या थोड्या अवकाशांत भरून दिली कीं, जरी हे लोक रंगेल आणि विलासी आहेत, तरी प्रसंग पडल्यास कितीही अडचण सोसण्यास तयार होतात, हें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें. अनेक लोकांनीं आपली चैन व सुख एकीकडे ठेवून, फार तर काय; परंतु घरांतील जिन्नस विकून ही खंडणी पटवून, आपल्यास ऋणमुक्त करून घेतलें. त्या वेळेपासून ह्या देशानें दुसऱ्या कोणत्याही मानगडींत न पडतां आपलें अंत:स्वरूप सुधारण्याचा प्रारंभ केला. सन १८७० पुढें सांगण्याजोगी गोष्ट ह्मणजे १८७१ सालीं झालेलें कम्युनिस्ट लोकांचें बंड होय. सन १८७५ सालीं प्रजासत्तात्मक राज्याचा पाया नीट बसवून, ह्या लोकांनीं सुधारणा सुरू केली. व

१८८९ साली एफेलटावर विश्वप्रदर्शन हीं १७८९ चे राज्यक्रांती-चीं स्मारकें उठवून दिलीं. याप्रमाणें एकंदर शहराची व्यवस्था उत्तम करण्याकडे त्यांचें लक्ष लागलें.

एकंदर पृथ्वीवरील रमणीयतेचें व विलासाचें आदिस्थान प्यारिस शहर होय. सेननदीचे प्रवाहानें ह्या शहराचें लहान मोठे असे दोन विभाग झाले आहेत. एकंदर शहराचें क्षेत्रफळ औरस चौरस तीस मैल आहे. सन १८९१ मध्यें शहराची लोकसंख्या चोवीस लक्ष सत्तेचाळीस हजार होती. शहराचे संरक्षणार्थं सर्व शहरभोंवतीं प्राकार परंपरा बांधिले असून, नगराचे रक्षणाचें काम १०००० नगररक्षकांकडून केलें जात आहे. शहरकाम एक सरकार निर्दिष्ट व एक प्रजानिर्दिष्ट अशा दोन कामगारांकडून केलें जातें. वार्षिक खर्चाच्या खर्ड्याचा आकार बहुतेक ३००, ०००, ०००, फ्रँक जवळ जवळ येऊन पोंचतो. शहराच्या प्रत्येक भागाचें काम शेरीफ आणि त्यास दोन सल्लामसलत देणारे यांजकडून केलें जातें. प्यारिस हें केवळ राजदरबारचें ठिकाण आहे असें नाहीं तर सर्व प्रकारचे लोकांना आपापले व्यासंग सफल करून घेण्याचेंही स्थान आहे. या नगरांत मोठ मोठे विद्वान् कारागीर, व्यापारी व सुखाभिलाषी लोक या सर्वांना आपापले हेतु सिद्धीस नेण्यास सर्व प्रकारचीं साधनें सज्ज असतात. ही प्यारिस शहरची कीर्ति केवळ आधुनिक नसून, फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. पूर्वी ग्रीस देशामध्यें ज्याप्रमाणें अद्वितीय बुद्धिबलाचे सात लोकांचे मंडळ होतें, त्याप्रमाणें प्यारिस शहरामध्यें पूर्वी द्वादश विद्वज्जनांचें मंडळ होतें; परंतु मुख्यत्वेंकरून ह्या नगराला जें प्रस्तुत महत्व आलें आहे, तें येथील प्रसिद्ध विश्वविद्यालयाचेमुळेंच ह्या विश्वविद्यालयांत देशोदेशीचे विद्यार्थी-

अनेकविशिष्ट शाळेंमध्यें ज्ञान पारंगतता मिळविण्यास येत असतात. ह्याप्रमाणें जसें हें आदिपीठ बनलें आहे, तसेंच विलासाचेंही आदिपीठ बनलें आहे. त्यांतून राजाचा उदार आश्रय व देशाची नैसर्गिक उत्तम स्थिती ह्यांचे योगानें कलाकौशल्याचें पाऊल फारच झपाट्यानें पुढें पडलें व सध्यांची मजल इतक्या अल्प अवधींत गांठता आली. दुसरें असें आढळून येईल कीं, प्यारिस शहरामध्यें दर वर्षी भरत असलेलें व्यापाराचें प्रदर्शन व व्यापाराला उत्तेजन येईल अशी कायद्याची योजना असल्यामुळें, ह्या शहराची फारच भरभराट होऊं लागली. ठिकठिकाणचे लोक नाना प्रकारच्या निमित्तानें ह्या शहरीं येऊं लागले व प्रतिवर्षी शहराचा विस्तार वाढतच जाऊन, आसमंतात् भागींचीं अनेक खेडीं व मोकळी मैदानें याचें पूर्वीचें भिकार स्वरूप जाऊन, त्या ठिकाणीं फारच थोड्या अवकाशांत प्रेक्षकांस आल्हाद देणाऱ्या अशा इमारती दृष्टीस पडूं लागल्या.

ह्याचप्रमाणें फ्रेंच लोकांचा विजयी बादशहा चवदावा लुई ह्याच्या कारकीर्दीमध्यें विद्येला व नगरशृंगाराला बरेंच प्रोत्साहान मिळालें. नगराला सुशोभित करणाऱ्या अनेक भव्य इमारती याच वेळेस बांधलेल्या आहेत. इतर राष्ट्रांनीं कलाकौशल्यामध्यें व नगरशृंगाराच्या कामामध्यें ह्याच लोकांचा कित्ता घेतला आहे. ह्याखेरीज जनसमूह ह्याच शहराकडे विशेषतः लोटण्याचें कारण म्हटलें म्हणजे, हें राजधानीचें शहर असल्यामुळें, साधारणतः लोकांची प्रवृत्ति असते, त्याप्रमाणें संपादन केलेल्या वैभवाचा उपभोग घेण्याकरितां जनसमूह इकडेच लोटूं लागला; व ह्या वेळेस फ्रान्स देशातील बहुतेक श्रीमान् लोक प्यारिस शहरचे राहिवासी झाले. शहरचें बाह्य स्वरूप व अंतःस्वरूप ह्यामध्यें आतोनात अंतर पडत चाललें. परंतु

मध्यंतरीं झालेल्या राज्यक्रांतिमुळें शहरच्या सुधारणेला बऱ्याच अंशीं धोका बसला व सर्व सुधारणेचीं यंत्रें जागच्या जागीं स्तब्ध राहि- लीं. परंतु भयंकर तुफान एकदां आटोपून गेल्यावर, ज्याप्रमाणें पूर्वी पेक्षांही जिकडे तिकडे शांतता होते, आणि आकाश पूर्वीपेक्षांही निरभ्र होतें, त्याप्रमाणें ही राज्यक्रांति आटोपल्यावर, पूर्वीपेक्षांही अधिक शांतता जिकडे तिकडे झाली. सर्व सुधारणा पूर्वीपेक्षां द्विगुणित वेगानें पुढें चालू झाल्या. सन १८७० सालीं जर्मन लोकांच्या लढा- ईच्या नुकसानाबद्दल त्यांना जी खंडणी द्यावी लागली, त्या वेळेस ह्या लोकांची जी दैना उडाली, हाच त्यांच्या विपन्नाव- स्थेचा कडेलोट झाला. असें सर्व लोकांना वाटूं लागलें नाहीं तोंच इ. स. १८८९ साली प्यारीस शहरीं जें विश्वप्रदर्शन झालें, त्यावेळेस फ्रेंच लोकांनीं अल्प काळांत पूर्वीचें वैभव संपादन करण्याचा जो विलक्षण गुण दाखविला, त्यामुळें सर्व जग आश्चर्यचकित झालें. ह्याप्रमाणें ह्या शहराला सद्यःस्वरूप कोणते कारणानें आलें ह्याचा संक्षिप्त विचार झाला.

वसंतऋतु व वर्षाऋतु हे प्यारिस शहर पहाण्यास चांगले आहेत, ह्यांतही विशेषेंकरून वसंतऋतु तर फारच चांगला. ग्रीष्म ऋतुतले माठे दिवस हे शहरांतील देखावे पहाण्यास बरे असतात; परंतु ह्या वेळीं उन फार कडक पडत असतें. हिंवाळा फार कडक नसतो; परंतु दिवस लहान असल्यामुळें प्रवाशास देखावे पहाण्यास थोडी गैरसोय होते.

होटेल व्हिले.

प्यारिस नगरांतील साधारणतः टाऊनहालप्रमाणें या सुंदर इमा- रतीची गणना केली जाते. बहुतेक सर्व नगरांतील अति रमणीय

इमारतींमध्यें हिची गणना होते. ह्या इमारतीला प्रारंभ इ. स. १९३३ मध्यें झाला. परंतु त्या वेळची इमारत राज्यकारभार किंवा नागरिक व्यवसाय सुयंत्र चालवितां, येतील एवढी विस्तीर्ण नसल्या-मुळें ह्या, इमारतीमध्यें नेहमीं कमीजास्ती करावे लागत असे. आणि अशा रीतीनें नेहमीं अदलाबदल होऊन हल्लींची इमारत पूर्वी-चे इमारतीचीच भव्य व पूर्वीपेक्षां शतगुणित शृंगारेलली आहे. ह्या इमारतीची आकृति चतुष्कोणांत साधली असून, चारी बाजूचे कोनावर अंडाकृति घूमट उठविलेले आहेत. लोहालंकारांनीं युक्त अशा वातायनांनीं ह्या इमारतीच्या चारी बाजू अलंकृत केल्या आ-हेत, जणूं काय प्यारिसशहराची अवर्णनीय शोभा अवलोकन करण्या-करितां ह्या प्रासादांनीं वातायनरूपीं आपले नेत्र तिकडे अनिमिषवृत्ति धारण करून प्रेरित केलें आहेत. शेवटच्या मजल्यावरून चित्रविचित्र रंगांनीं सुशोभित केलेलीं व इमारतीच्या अंतःप्रदेशांत स्वच्छ हवेचा पुरवठा होण्याकरिता गवाक्षें जणूं काय गगनाशीं स्पर्धाकरीत आहेत. इमारतीच्या चहूंबाजुंनीं लोखंडाचे गज ठोकून मध्यें वरचे मजले उभारले आहे. तळ मजल्यावर चतुष्कोण लोहस्तंभ रोवून त्याजवर वरचे मजले आहेत व मनोरे यांवर अर्धांडाकृति घुमट उभारलेले आहेत. ह्या इमारतीचा दर्शनी दिसणारा व रम्यतेचें केवळ आगर असा जो प्रदेश त्याचे, समसमान तीन विभाग केले आहेत. हा प्रदेश एकंदर भागापेक्षां किंचित् पुढें आलेला आहे. एकंदर आकृति महिरापांची असून दोन्ही बाजुंचे दोन रस्ते अश्वरथाचा सहज आंत प्रवेश व निर्गम होईल असे आहेत. मध्यद्वारासमोर प्रसिद्ध कारागीर जो ब्लँकार्ड याणें रचलेली शास्त्रदेवतेची उदात्त व मार्केस्ट याणें रचिलेली कलादेवतेची अप्रतिम प्रतिमा उभ्या आहेत.

काय तेथील कौशल्य व शास्त्ररचना ह्या पाहून ह्या देवतांनी येथेच आपले वसतिस्थान केले आहे. वरील प्रासादाच्या मुख्य मुख्य दिवाणखान्यांत आजपर्यंत होऊन गेलेल्या प्रसिद्ध पुरुषांचे पुतळे ठेविले आहेत. आणि पटईवर तर फ्रान्स देशांतील सर्व नगर सोनेरी वेलबुटींत खोदलेले आहे. द्वारप्रदेशावर नवीन पद्धतीवर बांधलेलें एक विशाल घड्याळ ठेविलें आहे. त्याच्या रक्षणार्थच जणुं काय मोठ मोठे धिप्पाड असे सात पुतळे ठेविले आहेत. त्याचे पलिकडील बाजूस उत्तम रंग दिलेले असे दहा प्रतिहार आहेत. ह्या इमारतींत असलेल्या पुतळ्यांची संख्या जवळ जवळ दोनशें आहे. इतर बाजूही वरील बाजू सारख्याच प्रेक्षणीय आहेत. ज्या बाजूने सेन नदीचा स्वच्छ प्रवाह वाहत जात आहे, तिकडील बाजूस एक लहान पण सुबक बाग आहे व ह्या बागेमध्यें एक भव्य व अश्वारुढ झालेला एटिनमार्सेस याचा पुतळा आहे. पार्श्वबाजूकडील द्वारप्रदेशाचे संरक्षणार्थ पीत वर्णाच्या मृगराजाच्या दोन प्रतिमा बसविल्या आहेत. ह्या इमारतीची अनेक विशाल प्रांगणे आहेत व त्यांत मधून मधून संगमरवरी दगडाचे अनुपम सौंदर्याचे पुतळे ठेविले आहेत. इमारतीचे अंतर भागांत अनेक सरकारी ऑफीसें आहेत. परंतु केवळ पाहणारासच आंत जाण्याची मनाई आहे. तळ मजल्यावर सेन्टजीन या नावांचा दिवाणखाना आहे. त्या दिवाणखान्यांत मोठमोठ्या सभा भरतात. त्याचे वरचा मजला सार्वजनिक उत्सवाकरितां योजिलेला आहे. ह्या मजल्यावर जाण्यास दोन सुशोभित संगमरवरी दगडाच्या सोपानपरंपरा आहेत. ह्या मजल्यावरील निरनिराळ्या भागांत चित्रसंग्रहाच्या जागा फार कुशलतेनें अलंकृत केलेल्या आहेत. चित्रकलेमध्यें निष्णात अशा सेलिंग कारागिरानें तें चित्रित केलें आहे. सोपानाच्या शिरोभागीं असलेल्या चतुष्कोणांत पारिसचें सांदर्य-

बाग व आसमंतात्मार्गीच्या प्रदेशाचे सुबक देखावे दाखविले आहेत. उत्तरेकडील सोपानपंक्तिवरून चढून गेलें असतां, प्रेक्षकास दोन महाल लागतात आणि तेथून उत्सवाचा समारंभ करण्याकरितां बांधिलेल्या महालांत मनुष्य जाऊन पोचतो. हा दिवाणखाना १६१ फूट लांब ४२ फूट रुंद व ४२ फूट उंच आहे. पटईपासून भिंतीवर सोडलेल्या चित्रांमध्यें खालील चित्रें विशेष प्रेक्षणीय आहेत. गायनकलेचा प्रसारदसोरम; विशेष मनोहर तिसऱ्या चित्रांत प्यारिस नगर कुमारिकारूपानें प्रगट होऊन, आपल्या अंत:पुरांत होत असलेल्या महोत्सवाचा लाभ घेण्याकरितां सविनय सर्वजगास आग्रह करित आहे. चवथ्या चित्रांत पुष्पवाटिका काढल्या आहेत.

नॉटरडेम.

नॉटरडेम ह्या नांवाचे देवालय इ. स. ११६३ ह्या सालीं स्थापित केलें. ह्यावेळेपासून देवळाचे कामास सुरवात झाली; परंतु १३ वे शतकापर्यंत ह्यांतील मुख्य भाग पुरा झाला नव्हता. त्या वेळेपासून ह्या मदिरामध्यें पुष्कळ फेरफार होऊन इ. स. १८४५ सालीं ह्यास कायमचा आकार प्राप्त झाला. आसपासच्या उत्तुंग (उंच) प्रासादाशेजारीं हें मंदिर खुलून दिसावें तसें जरी दिसत नाहीं, तरी शिल्पशास्त्राचे मार्मिकांस ह्या मंदिराचें काम फारच पसत पडतें. राज-क्रांतीचे वेळेस ह्या देवळाला श्री साडेसाती आली, तेव्हां हें मंदिर जमीनदोस्त होण्याचे बेतांत होतें; परंतु त्या वेळेस फक्त पुतळेच जमीनदोस्त करण्यांत आले. त्या मंदिरातील साधुसंतांच्या मूर्ति झुगारून देऊन, त्याठिकाणीं स्वतंत्रता देवीच्या भक्तांनीं स्वतंत्रेची, न्याय-

देवतेची, अशा प्रतिमा स्थापित केल्या. आन्हिक प्रार्थनेच्या ऐवजीं स्वतंत्रता देवीच्या गाण्याचा जिकडे तिकडे गजर कानीं पडूं लागला. परमेश्वराची प्रार्थना करण्याचें स्थंडिल मोडून त्या ठिकाणीं विचारदेवतेचें सिंहासन उठवून दिलें. आजुबाजूस शुभ्र स्फटिकाच्या पुतळ्या करून त्यांच्या हातांत सत्यरूप तैलानें पाजळलेले ज्ञानदीप दिले होते. याप्रमाणें जिकडे तिकडे धामधूम माजून राहिली होती. इ. स. १८०२ सालीं नेपोलियन बादशहानें हा थिल्लरपणा मोडून टाकून ह्या इमारतीला पुनः प्रार्थनामंदिराचें रूप दिलें. ह्या मंदिराचा दर्शनी भाग फारच सुबक आहे; व फ्रान्स देशामध्यें पुष्कळ ठिकाणीं ह्याच वळणावर काम केलें आहे. ह्या दर्शनीभागाचे साध्या बटूसचे योगानें तीन विभाग केले आहेत. एकंदर हें मंदिर तीन मजली असून, शिवाय त्यावर सौधशिखरें आहेत. प्रथमारंभीं दिसणारीं तिन्ही द्वारें हीं भिंतीमध्यें एका पाठीमागें एक असलेल्या, अशा कमानींनीं सुशोभित केलीं आहेत. ह्यांतील प्रत्येक दरवाज्यावर राज्यक्रांतीच्या तडाक्यांतून वांचलेलीं अशीं पुष्कळ नक्षीचीं व कोरलेलीं चित्रें शिल्लक राहिलीं आहेत; तीं पाहून मनुष्य अगदीं थक होतो. मध्यद्वारावर (लास्ट जजमेन्ट) परमपूज्य क्राइस्त सिंहासनावर बसलेला आहे; सर्व मनुष्य प्राणी आपापल्या थडग्यांतून बाहेर येऊन करद्वय जोडून ईशनंदनाच्या चरणारविंदीं नम्र झाले आहेत व आकाशांतील बाप त्यांच्या कर्मानुरूप त्यांस शासन करित आहे. असा भाग आहे. मध्यद्वाराच्या स्तंभावर क्राइस्तची अलीकडील पद्धतिप्रमाणें कोरलेली प्रतिमा आहे. तळमजला व दुसरा मजला यामध्यें सुंदर पाषाणांचीं कोनाडीं खोदून त्यांत अठ्ठावीस पुतळ्यांची फ्रान्स देशाची नृपमाला बसविलेली आहे. ह्या

नृपमालिकेच्या वरच दगडाची जाळी बसवून, तिचेवरील प्रांतावर मवोमच स्मितहास्य करणारी व सौंदर्य समुद्रांतून निघालेली अशी कुमारिकेची पुतळी उभी केली आहे. दोन्ही बाजूस दोन अप्सरा उभ्या केल्या आहेत. ह्याच जवळच्या जाळीच्या शेवटाकडील प्रदेशीं खिस्तानुयायी यांच्या पवित्र शास्त्राप्रमाणें जगताचा आदिजनक आदम व आदिजननी इव्ह हीं उभीं केलीं आहेत. ह्या पुतळ्यांच्या पार्श्वदेशीं ह्मणजे द्वितीय मजल्याचे मध्यमार्गी षोडशदलांनीं युक्त अशा कमलाकृतीचें, कांचांनीं सुशोभित केलेलें असें गवाक्ष आहे; त्याचे भोंवतीं अर्धा भागपर्यंत पाषाणांत नागमोडी आकृति काढलेली आहे. कमलाकृती गवाक्षाचीं षोडशदळें परिघापर्यंत निरनिराळ्या रंगांच्या भिंगांनीं दाखविलीं आहेत. ह्या गवाक्षाचा व्यास ४२ फूट आहे. ह्या गवाक्षाच्या दोन्ही बाजूंस दीर्घ वर्तुलाकार कमानी असून, नंतर प्रत्येकीचे अंतर्भागांत त्याच आकृतीच्या अशा दोन दोन कमानी उभारल्या आहेत. कमानीचे वरचे बाजूस असलेल्या त्रिकोणांत स्वस्तिकें व चक्राच्या आकृतीचीं फुलें कोरलीं आहेत. तिसरा मजला ह्मणजे एक दीर्घ वर्तुळाकृती शिरोभाग असलेली कमान तर दुसरी शिरोभागीं त्रिशूळ असलेली अशा कमानींची रमणीय ग्यालरी आहे. या कमानी एकेरी खांबावर बसविल्या आहेत. ह्या ग्यालरीवर सज्जा व त्या सज्जावर अनेक वन्यपशु, राक्षस व माणसें यांचीं चित्रें काढलीं आहेत. ह्याच्यावर चतुष्कोणाकृती अशीं दोन सौधशिखरें व मनोरे आहेत. ह्या प्रत्येक मनोऱ्यांत ५४ फूट उंचीच्या अशा दोन दोन खिडक्या आहेत. ह्या मंदिराचें कायर, मध्य भागाचे शेजारचे पश्चिम भागाचीं वातायनें व रचना हीं पाहण्याजोगीं आहेत. मंदिरांतील अंतःप्रदेश फारच अवर्णनीय आहे. अंत-

वेदिकेवर असलेला त्रिशूळ १४७ फूट उंच आहे. मंदिराची लांबी १३९ यार्ड व रुंदी ५२ यार्ड आहे. स्थंडिला शेजारचा भाग वर्तु-ळाकार आहे व त्या सभोंवतीं दोन पार्श्वपथ काढले आहेत. तळा-पासून घुमटापर्यंत उंची ११० फूट आहे. ह्या सभामंडपाला ७५ खांबाचा आधार आहे. सभामंडपाच्या पार्श्वपथावर तिन्ही बाजूंनीं एक सज्जा आहे. मुख्य बाजूच्या गवाक्षांत बसविलेली हिरव्या, तांबड्या, पिवळ्या, अस्मानी, सुवर्ण वगैरे रंगाच्या भिंगांची प्रभा ज्या वेळेस आंत संगमरवरी फरशीवर पडते, व वाद्यांचे सुस्वर आवाज ज्यावेळेस निघत असतात व परमेश्वराच्या चरणीं एका-ग्रता होऊन जाते, त्यावेळेस आपण मृत्यु लोकांत आहोंत हें विसरून जाऊन, लोक क्षणैक सच्चिदानंदांत डोलूं लागतात. इ. स. १७५० त बांधलेलें ऑरगन नांवाचें वाद्य फार मोठें आहे. त्यास ५२६६ नळ्या आहेत व ८६ किल्या आहेत. धर्मोपदेशकाचें व्यासपीठ फारच कुशलतेनें कोरलेलें आहे. नानातऱ्हेच्या जाळ्या व वेलबुट्या त्याजवर खोदलेल्या आहेत. ह्या मंदिराचे सर्व कोनांत आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व धर्मोपदेशकांचे पुतळे ठेविले आहेत. ह्या मंदिराचे कोशागारांत अतिशय मौल्यवान् पदार्थ ठेविले आहेत. त्यामध्यें एक मोठा त्रिशूळ व पांच माणि बसविलेल्या अशा साधुद्वयांच्या रौप्यमूर्ति आहेत. अनेक सुवर्णाचे पेले, बहुमोलाचे करंडक आणि प्राचीन काळचीं वस्त्रें ठेविलीं आहेत. ऐतिहासिक वस्तूंपैकीं नेपोलियनाचा राज्याभिषेकाच प्रसंगाचा पोषाख आहे. आणि मुख्य धर्मोपदेशक ॲफर ह्यांचीं रुधिरप्लुत वस्त्रें आहेत. ह्या मंदिराच्या शिरोभागावरून जो देखावा दिसतो, तो तर अवर्णनीय आहे. सेन नदीचा रौप्य प्रवाह, त्यांत हजारों इमारती प्रतिबिंबित झालेल्या,

दोन्ही तटांवर बसविलेले अनेक विशालपूल, या पुलांखालून जाणाऱ्या नगरांतील विलासीजनांनीं भरलेल्या नौका, वरून जाणारे अश्वरथ, ह्या सर्वांचा जो देखावा आढळतो त्याचें ज्या ज्या वेळेस स्मरण होतें, त्या त्या वेळेस असा प्रकार पुनः केव्हां दृष्टीस पडेल, अशी मनाला चटपट लागून राहते. ह्या देवळांत टांगलेल्या घंटेचें वजन १६ टन आहे. आंतील लोळ्याचें वजन अर्धा टन आहे. पार्श्वभागीं बागेमध्यें एक कृत्रिम सरोवर आहे. त्या सरोवरांत देवदूतांनीं जर्जर केलेल्या पिशाच्याच्या तोंडांतून जलोद्गार होत आहे. ह्या सरोवरांत अनेक स्तंभावर उभारलेलें भव्य छत झळकत आहे. ह्या सरोवराच्या दक्षिणेस एक लहानसें अपघातमृतागार आहे. ह्याच्या फरशीवर संगमरवरी दगडाचे अनेक शिलापट्टखचित केले आहेत. ह्या शिला सदैव थंड राहण्याकरितां वर निर्दिष्ट केलेल्या सरोवराचे पाट आणून त्यामधून खेळविले आहेत. अशा ह्या सिद्ध केलेल्या आसनावर कोणी नदींत देहत्याग केलेले, कोणी इतर मार्गानें आत्महत्या केलेले, किंवा इतर कोणतेही अज्ञात कारणानें गतप्राण झालेल्या मानवांचीं प्रेतें, मोठ्या गौरवानें ठेविलेलीं असतात. कोणी आप्तसंबंधी असल्यास ते आपल्या मृत बांधवांचें प्रेत नेऊन त्यास यथाविधि अंत्यसंस्कार करितात. येथील हवेचा व पाण्याचा असा गुण आहे कीं, त्या योगें तेथें तीन तीन महिने तीं प्रेतें जशीचे तशींच राहतात ह्या प्रेतांची संख्या दरवर्षी ८०० वर होते व त्यापैकीं सातशेंपेक्षा जास्ती नवयुवती असतात. ह्याचा वाचकांनीं विचार करावा. हें प्रेतागार पाहण्यास लोकांच्या झुंडीच्या झुंडी रोज लोटतात.

क्यारुझल.

ही इमारत पूर्वी फारच लहान होती. परंतु आतां बरीच वाढलेली आहे. ह्या ठिकाणीं चवदावा लुई यानें इ. स. १६६२ त घोड्यावरचा बॉल करविला. हा एक प्रकारचा चौक दोन्ही राजवाड्यामध्यें आहे, तरी या ठिकाणीं बरीच देवघेव होते. एकंदर देखावा फारच सुरेख दिसतो. ह्या ठिकाणीं नेपोलियन बादशहाचे आज्ञेवरून इ. स. १८०६ यामध्यें मिळालेल्या जयाचें स्मारक ह्मणून, एक विशाल कमान बांधली आहे. • पूर्वी प्रसिद्ध ट्युलेरी राजवाड्यांत प्रवेश ह्या उंच कमानींतून होत असे. ही कमान ४८ फूट उंच, ६३ फूट रुंद व २१ फूट जाड आहे. ह्या मुख्य कमानींत लहान लहान तीन इमारती खोदल्या आहेत. ह्या कमानीस रक्तवर्णाच्या संगमरवरी दगडांचा आधार आहे. ह्या खांबांचें अग्र व उथाळें नक्षीदार असून, पंचरसी धातूचे आहे. ह्या रक्तवर्ण स्फटिकस्तंभावर संगमरवरी दगडांचे फ्रान्स देशांतील सैनिकांचे पुतळे बसविले आहेत. ह्या इमारतीच्या दोन्ही बाजूंस नेपोलियन बादशहा आणि त्याचे शिपाई लोक यांनीं ज्या लढाया जिंकिल्या, त्या दाखविल्या आहेत. दर्शनी भागाचे उजवेकडे आस्टरलिटझ येथें झालेली लढाई दाखविली आहे. डावे बाजूस आल्म येथें आस्ट्रियन सेनापती मॅक शरण आला तो प्रसंग वर्णन केला आहे. पाठीमागचे बाजूस उजवीकडे टिल्सिट येथें झालेला तह, डावीकडे म्युनीच शहरांमध्यें नेपोलियनचा प्रवेश, उत्तरेकडील बाजूवर व्हायेना मधील प्रवेश व दक्षिण बाजूस प्रेसबर्ग येथें झालेला तह दाखविला आहे. प्रथम या कमानीच्या शिरोभागीं

वेनिस येथून आणलेला सेंटमार्क या देवालयाचा चतुष्कोणी घुमट बसविला होता; परंतु बादशहानें तो परत करवून, त्याच आकृतीचा दुसरा घुमट बसविला आहे.

राजवाड्यांतील उद्यानभूमिका.

हें उद्यान फारच साधें असून मनोहर आहे. याची २५० यार्ड लांबी व रुंदी ११० यार्ड आहे. ह्या उद्यानाचे चारी बाजूंनीं नागरिक जनांस सहल करण्यास व हितगुजाच्या गोष्टी करण्यास सोईचे असे पार्श्वपथ काढिले आहेत. या पथांच्या आंतील बाजूस लोखंडाचे गज ठोकून, उद्यानभूमिकेचे प्रांत नियंत्रित केलेले आहेत. या लोहवृत्तीचे जवळच मृत्तिकेचे लहान लहान बांध घालून, त्यावर नानाप्रकारचे पुष्पवृक्ष व लता लाविल्या आहेत. त्यामुळें ह्या भागास चित्रविचित्र रंगाच्या गालिच्यांची शोभा येते; बाकीचा अंतःप्रदेश केवळ मोकळा ठेविला आहे. ह्या प्रदेशीं जिकडे तिकडे सूक्ष्मवालुका टाकिली आहे. मधून मधून संगमरवरी चवथाऱ्यावर भव्य पुतळे ठेविले आहेत, व त्या पुतळ्यांच्या पायथ्याशीं लहान लहान झाडांच्या कुंड्यांची गर्दी लागून गेली आहे. मध्यभागीं ६६ फूट व्यासाचें एक वर्तुलाकार कृत्रिम सरोवर आहे. कारंज्यांतील जलोद्गार आसपासच्या वृक्ष शिखरांच्या स्पर्धेनें गगनाचें चुंबन घेत आहे, मंद मंद वायूचे योगानें त्याचे कणशः विभाग होऊन, खालीं येत असतांना, प्रेक्षक जनांवर जणूं काय मौक्तिक वृष्टी होत आहे. ह्या उद्यानाच्या चारी बाजूस विद्युत्तेजानें प्रकाशित केलेल्या दीपस्तंभाची परंपरा लागली आहे. त्याचेच पलीकडील बाजूस नवपल्लवानें डवरलेले व टवटवीत असल्यामुळें मनोहर भासणाऱ्या अशा वृक्षांची राई थेटपर्यंत लागून राहिली आहे. सायंकाळीं

सूर्य अस्तास जात आहे, सुगंध वायु मंद सुटला आहे, गायनाचा नाद उडून राहिला आहे, अशा वेळेस या उद्यानास केवळ नंदनवनाची शोभा येते.

ला माडलीन.

हें मंदिर सेंटमेरि माडलीन नांवाचें परिव्राजिकेचे सन्मानार्थ बांधिलें आहे. ह्या कामास इ. स. १७६४ मध्यें प्रारंभ झाला; परंतु अनेक अडचणींमुळें हें १८४२ पर्यंत समाप्त झालें नाहीं. ह्यास एकंदर खर्च सुमारें ७५ कोट रु. लागला. नेपोलियन बादशाहाचा बेत, हें आपलें दिग्विजयाचें स्मारक करावें असा होता; परंतु अठरावा लुई ह्यास तें पसंत न पडल्यामुळें, त्यानें तो बेत फिरवून हें मंदिरच कायम केलें. हें मंदिर रोमन आणि गॉथिक धर्तीवर बांधिलें आहे. याची लांबी ३९४ फूट व रुंदी १४१ फूट आणि उंची शंभर फूट आहे. हें मंदिर तेवीस फूट उंचीच्या चवथऱ्यावर आहे आणि चोहों बाजूंनीं विशाल खांबांच्या रांगा लागल्या आहेत. ही इमारत सर्व दगडाची आहे व तिला वातायनें मुळींच नाहींत. दर्शनी खांबांचे अग्र भागीं, अलीकडील साधुसंतांच्या चवतीस प्रतिमा बसविल्या आहेत. दर्शनी भागाचे वर असलेल्या त्रिकोणी जागेंत, येशू सर्व पुनरुद्भुत लोकांस पावन करून घेत आहे, असा भाग आहे. ह्या मंदिराला जीं द्वारें आहेत, तीं पंचरसी धातूचीं आहेत व त्यांवर पवित्र पुस्तकांतील आज्ञा लिहिल्या आहेत. द्वारांची उंची ३८ फूट आहे व रुंदी सोळा फूट आहे. मंदिरांतील अंतर्भूमिका व

भिंति संगमरवरी दगडाच्या आहेत; पटई घुमटाकार असून असे घुमट तीन आहेत. ह्या घुमटास खोदलेल्या जाळ्यांमधून, आंत उजेड पडतो. आंत चित्रें आहेत तीं फारच मनोवेधक आहेत; त्यांत माडलीन ही कुमारी येशूच्या शोधार्थ वनांत हिंडत आहे व त्याची गांठ पडल्यावर भक्तिपुरःसर त्याचें पादप्रक्षालन करित आहे. तिला मुक्ति मिळून देवदूत स्वर्गी घेऊन जात आहेत, हीं चित्रें फारच चांगलीं आहेत. मुख्य स्थंडिलाचे सभोंवतीं शुभ्र स्फटिकाचीं पुष्कळ चित्रें नीट व्यवस्थेनें ठेविलीं आहेत. स्थंडिलाचे पार्श्व भागीं वर्तुलाकार पटईवर ख्रिस्तीधर्माचे प्रसाराचा वृत्तांत नाना प्रकारचे शाईनें लिहिला आहे. मंदिरांत प्रवेश करण्याकरितां पुष्कळ पायऱ्या आहेत. चढतांना क्वचित् कोणी दमल्यास त्यास विसावा घेण्याकरितां मधून मधून मोठ मोठ्या पायऱ्या ठेविल्या आहेत.

ऑपरा नाटकगृह.

सर्व जगांतील सौंदर्याचें केवळ अधिष्ठान असें हें नाटकगृह आहे. प्यारिस मधील सर्व प्रासादांपेक्षांही हें अतिशय शोभिवंत दिसतें. याचे द्वारावर " जगांतील सर्व सौंदर्याचें प्रदर्शन" असा लेख मोठ मोठ्या सोनेरी अक्षरांनीं कोरलेला आहे, तो अक्षरशः खरा आहे. या नाटकगृहाची रचना, यास लागलेलें बहुमूल्य सामान व एकंदर येथील शृंगार पाहून, क्षणभर मनुष्य भांबावून जातो. आपण स्वप्न पाहतों आहों कीं सत्याची प्रतीति पहात आहों, याचा त्याला

संशय पडतो. त्यांतून प्रयोगाचे दिवशीं तर मनुष्याची जी स्थिती होते, ती तर केवळ अवर्णनीय आहे. हजारों दिवे लागलेले, नाना तऱ्हेचीं उज्वल वेष्ठणें असल्यामुळें, ज्या ज्या ठिकाणीं दीपप्रभा पडते तें तें ठिकाण निरनिराळ्या धातूंचें बनविलें आहे, असा भास होतो; जिकडे तिकडे प्रेक्षकांची गर्दी होऊन जाते; तो प्रेक्षक समुदाय तरी किती मनोरम! लोकांची त्या वेळची वृत्ती तरी किती आनंदयुक्त; इकडे नाना तऱ्हेच्या सुवासिक पुष्पांचे हारावलीनें व स्वदेहावर सिक्त केलेल्या सौगंधिक द्रव्याचे योगानें नाटकगृह इतकें परिमलयुक्त होऊन जातें कीं, ज्याच्या सुवासानें तिन्ही लोक लुब्ध होऊन जातात, असें वर्णन केलें आहे, तोच स्वर्गवृक्ष तर येथें आणला आहे काय असा भास होतो. ही भव्य इमारत बांधण्यास इ. स. १८६१ त प्रारंभ झाला व सन १८७४ मध्यें या इमारतीचें काम शेवटास गेलें. सर्व जगामध्यें एवढे विस्तीर्ण नाटकगृह कोठेंही नाहीं. याचें क्षेत्रफळ १३९९६ चोरस यार्ड आहे; परंतु प्रेक्षक जनांच्या सोईकडे इतकें लक्ष दिलें आहे कीं, या गृहांत दोन हजार एकशें छपन्नपेक्षां जास्ती प्रेक्षकांचा समावेश केला जात नाहीं. या नाटकगृहाचे आकाराची बरोबर कल्पना येण्यास, याचे सभोंवतीं फिरून पाहिलें पाहिजे, किंवा एखाद्या उच्च ठिकाणाहून याचें निरीक्षण केलें पाहिजे. ज्या जागेवर ही इमारत उभी आहे, त्या जागेस ६२ लक्ष रुपये पडले आणि बांधण्यास खर्च २ दोन कोट ९० हजार रुपये लागला आहे. ज्या ज्या पदार्थांनीं ही इमारत अलंकृत केली आहे, ते पदार्थ केवळ अद्वितीय आहेत. हीं साधनें युरोप खंडांतील सर्व राष्ट्रांतून आणलीं आहेत. स्वीडन आणि स्कॉटलंड मधून हिरवे आणि तांबडे दगड, इटालींतून पिवळे व शुभ्र पाषाण, तसेंच फिन-

आंतहून नील व रक्त वर्णाचे दगड आणले आहेत. प्रथम दर्शनी भागास तीन मजले आहेत व वर चढून जाण्यास विस्तीर्ण अशी सोपानपरंपरा आहे; ती ३२ फूट रुंद आहे.

तिच्या दोन्हीं बाजूस पुतळ्यांच्या रांगा आहेत. रंगभूमि १९६ फूट उंच, १७८ फूट रुंद व ८४ फूट लांब आहे. हिच्याजवळ एक बॉलरूम आहे. तिच्यामध्यें जो एक आरसा लाविला आहे, तो २३ फूट रुंद व ३३ फूट उंच आहे. पडदे व अनेक प्रकारचे देखावे दाखविण्याकरितां रंगभूमीच्या खालीं ४० फूट जागा खणली आहे. यांत जीं झुंबरें लाविलीं आहेत, त्या प्रत्येकांत ३४० दिवे लावले जातात व खालून पहाणारास जणूं काय मोत्यांचे हार टांगले आहेत असा भास होतो.

कॉलमडी व्हेंडोम.

हा एक विजयस्तंभ आहे. प्रसिद्ध **रोमन** बादशहा **ट्रेजन** यानें आपल्या पराक्रमाचें स्मारक ह्मणून एक विजयस्तंभ उभारिला आहे; व हा विजयस्तंभ याच धोरणावर बांधिला आहे. याची उंची १४२ फूट असून याचा व्यास १३ फूट आहे. हा विजयस्तंभ प्रसिद्ध **नेपोलियन** याचे आज्ञेवरून उभारला आहे. त्यास अनेक कारागिरांचे हात लागले आहेत. हा स्तंभ उभारण्याचें काम १८०६-पासून १८१० पर्यंत चालू होतें. **रशियन** व **आस्ट्रियन** या लोकांचा जो **नेपोलियन** यानें पराभव केला, त्याचें स्मारक हा स्तंभ उभारिला आहे. हा खांब चिरेबंदी असून त्यावर पंचरसी धातूंच्या पट्ट्यांचें

वेष्टण आहे. हा पट्टा ९०० फूट लांब आहे. ह्या पट्ट्यावर आणि त्याच चौथऱ्यावर खांब उभा आहे, त्या चौथऱ्यावर सन १८०९ सालीं घडलेले सर्व युद्धप्रसंग खोदलेले आहेत. या विशाल स्तंभाचे वेष्टणास लागलेला पंचरस रशियन व आस्ट्रीयन लोकांपासून जिंकलेल्या बाराशें तोफा गाळून तयार केला आहे. या स्तंभाचे शिखरावर प्रसिद्ध नेपोलियन बादशहाची प्रतिमा राजवस्त्र परिधान केलेली अशी दाखविली आहे. इ. स. १८७१ सालीं कम्युनिस्ट लोकांचे बंडांत हा खांब बहुतेक जमिनदोस्त झाला होता; परंतु त्याचे अवशेष राहिलेले भाग एकत्र करून फिरून त्यांस पूर्वींचे स्वरूप इ० स० १८७५ मध्यें दिलें आहे.

एफल टॉवर.

हा प्रसिद्ध मनोरा १८८९ सालीं झालेल्या प्रदर्शनाचे वेळेस बांधलेला आहे. ट्रोकॅडरो राजवाड्याचे जवळ सेन नदीचे उत्तर तटाकावर हा विशाळ मनोरा दृष्टीस पडतो. हा एफेल नांवाच्या मनुष्यानें बांधला आहे म्हणून यास एफेल टॉवर हें नाव दिलें. जगांतील अशा प्रकारचे स्मारकांमध्यें ह्या टॉवरचाच पहिला नंबर आहे. ह्याची उंची ९८४ फूट आहे, म्हणजे जगांतील अती उंच मानलेल्या स्मारकांचे दुपटीपेक्षां फारशी कमी, नाहीं असें म्हटलें तरी चालेल. फार प्राचीन काळापासून उत्तुंगत्वाबद्दल एकसारखी ज्यांची ख्याति गाजत आली आहे, अशा मिसर देशांतील पिरॅमिडसच्या जवळ जवळ हा दुप्पट आहे. ह्या पिरॅमिड्सची उंची केवळ ४४९ फूट आहे. हा केवळ उंच आहे एवढेंच नव्हे तर मनुष्याच्या धाडसाची आणि अचाट प्रयत्नांची साक्ष देणारें हें एक भूषणच आहे. ह्याचप्रमाणें शिल्पशास्त्राचे परिपक्वतेचीही तो

साक्ष देत आहे. दृग्भ्रमामुळें नवकून हा टॉवर फारसा उंच भासत नाहीं. ह्या टॉवरचा पाया फार खोल खणला आहे. शेहचाळीस फूटपर्यंत भर घालून, नंतर मोठमोठे लोखंडाचे खांब घालून, आंतलें पाणी बाहेर घालविण्याकरितां, संकुचित केलेली हवा आंतमध्यें सोडली; अशा तऱ्हेनें पाणी बाहेर निघाल्यावर आंत वाळू व चुना टाकून पाया बांधून काढिला. पाया चौकोनी असून त्याचें क्षेत्रफळ ११२ चौरस यार्ड आहे. पायाच्या भिंती ८९ फूट जाडी-च्या आहेत. ह्या पायावर हा विशाळ पण सुबक असा लोखंडाच्या जाळीचा टॉवर उभारिला आहे. मुख्य आधार स्तंभ ९४ अंशाचा कोन करितात. ह्या टॉवरवर तीन चार मजले आहेत. त्यांतील पहिल्या मजल्याखालीं ह्या स्तंभांचा परस्पराशीं कमानीनें संयोग केला आहे. ह्या मजल्यावर बऱ्याच अंतरापर्यंत हे स्तंभ निरनिराळे आहेत, परंतु ९९० फूटांवर ह्यांचें सम्मेलन झालेलें आहे. ह्यास लाग-लेल्या गर्डर्स व लोखंडाच्या तुळया पोकळ आहेत. उभे असले-ले स्तंभ बारीक बारीक करीत दोन फुटापर्यंत नेले आहेत. वर चढ-ण्यास प्रेक्षकास परिश्रम न व्हावेत एतदर्थ मोठमोठाले झोके केलेले आ-हेत व त्या झोंक्यावरून वर चढता येतें. एका चौकस मनुष्यानें असें गणित काढिलें आहे कीं, ह्या टॉवरमध्यें जीं छिद्रें आहेत; तीं जर एकास एक लावून ठेविलीं तर चाळीस मैल लांबीचा एक त्याचा बोगदा तयार होईल. ह्या कामास मोठ मोठे २९ लक्ष लोहकील लागले आहेत. पायामध्यें हायड्रालिक प्रेस ठेवून अशी योजना केली आहे कीं, ज्या स्तंभाचा या टॉवरला आधार आहे, ते स्तंभ लागतील तितके वर चढवितां येतील. पहिला मजला जमिनीपासून

१९० फूट उंच आहे व त्याचें क्षेत्रफळ ५८९० चौरस यार्ड आहे. ह्यांत पुष्कळ चित्रें आहेत व दररोज सायंकाळीं बॅन्ड वाजत असतो.

दुसरा मजला ३२ चौरस यार्ड आहे. हा जमिनीपासून ३८० फुटांवर आहे. हा दुसरा मजला ह्मणजे एक आरंभमहालच आहे. याच ठिकाणीं हायड्रॉलीक लिफटचा कारखाना आहे. ६८० फुटांवर प्रेक्षकांस विश्राम घेण्यास एक जागा काढिली आहे. शेवटाकडे टॉवर सूक्ष्म होत होत अखेर ३१ यार्ड झाला आहे. अगदीं अग्र भागीं एक विशाल दीप आहे. ह्या दीपाचे खालीं ह्मणजे ९०४ फूट उचीवर तिसरा मजला आहे व त्यामजल्या समोंवतीं सज्जा आहे. ह्या सज्जावर तंबूच्या आकृतीचें एक काचगृह आहे. ह्या काचगृहामध्यें ८०० लोकांचा समावेश होऊं शकेल. ह्या शिखरावरून ९० मैलपर्यंत दूरचा प्रदेश दृष्टिचे आटोक्यांत येतो. कंदील ७९ फूट उंच आहे. ह्या कंदीलांतून वर एक जिना आहे, त्या जिन्यावरून वर गेलें असतां, विद्युत्तेजानें प्रकाशित दीपाजवळ आपण जातों. हा विद्युद्दीप ४५ मैलावरून दिसतो. शिखरापर्यंत एकंदर १७९२ पायऱ्या आहेत. पहिल्या मजल्यास ३५०, दुसऱ्यास ३८० व तिसऱ्यास १०६२ पायऱ्या आहेत. वर जाण्यास जिने सेननदीचे बाजुकडील आधारस्तंभांत आहेत.

कंकार्ड.

प्रसिद्ध राजमार्गांतून मार्गक्रमण करीत करीत आपण कंकार्ड नांवाच्या चतुष्पथांत दाखल होतों. हें विस्तीर्ण स्थळ अवलोकन

करून, मनाची वृत्ती अगदीं विलक्षण होते. सर्व इंद्रियांमध्यें दृष्टीस परमेश्वरानें जें सहिष्णुत्व ठेविलें आहे, त्याची परीक्षा पाहण्याचें हें स्थान होय. क्षणभर नेत्रांची अगदीं समाधान वृत्ती होऊन जाते व परम आल्हाद युक्त होऊन मनुष्यास मोठें आश्चर्य वाटतें. सर्व नगरवासी लोकांचें विहार करण्याचें हें एक उपवन आहे. ह्या विस्तीर्ण भूमिकेची लांबी ३९० यार्ड व रुंदी २३५ यार्ड आहे ह्या चतुष्पथाचे दक्षिण बाजूनें सेन नदीचा स्फटिकतुल्य प्रवाह वाहतो. पश्चिम दिशेस शाम्स एलाय नांवाच्या उद्यानभूमिका आहेत; इतर बाजूस मोठ मोठे विशाल सौध आपल्या प्रदेशास विभूषित करित आहेत. सायंकाळचे समयास या स्थळास अद्वितीय रमणीयता प्राप्त होते. सेन नदीच्या प्रवाहावरून मंद सुगंध वायु सुटतो व सुवासिक पुष्पांचा परिमल त्याजबरोबर जेव्हां सर्वत्र पसरून जातो, तेव्हां वायूच्या तरंगावर प्रेक्षकांचें अंतःकरणही डोलूं लागतें व सर्व उपाधींचें क्षणमात्र विस्मरण होऊन, मनुष्य आपलें देहभान विसरतो. सर्व नगरीमध्येंच काय, परंतु सर्व पृथ्वीमध्यें इतकें मनोहर ठिकाण क्वचित् असेल. ह्या चतुष्पथाचे मध्यभागीं उभे राहून आसमंतात अवलोकन केलें असतां, फारच उत्कृष्ट देखावा दृग्गोचर होतो. सर्व उद्यानभर शुक्तिकांचें चुर्ण पसरलेलें आहे. मृत्तिकेचे लहान लहान बांध घालून विवक्षित स्थलें रेखिलीं आहेत. मध्यभागीं अंडाकृती स्थलें दाखविलेलीं आहेत. ह्या स्थलांमध्यें दोन जलोद्धारयंत्रें व एक अभंग प्रसाराचा विशाल स्तंभ दृष्टिस पडतो. सर्व स्थळांचे सभोंवार दीपस्तंभांची परंपरा लागली आहे. प्रवेश केल्याबरोबर दृग्गोचर होणारे जलोद्धारयंत्राचे मध्य स्तंभाभोंवती गंधर्वकन्या व नाग-

कन्या काढिल्या आहेत. त्यांस नानाप्रकारचे रंग दिल्या कारणानें त्यांची एकंदर शोभा पाहून कितीहि अरसिक मनुष्य असला तरी क्षणभर तरी त्याची वृत्ती तल्लीन होऊन जाईल. कारंजाचे दगड फारच स्वच्छ आहेत. त्या दगडांवरही नानाप्रकारची रंगीत वेलबुट्टी काढली आहे. जलपाताचा विस्तार होण्याकारितां दोन वर्तुलाकार पात्रें जलस्तंभास जोडिलीं आहेत. कारंजाचा परीघ ९३ फूट आहे. जलोद्गार २८ फूट उंच जाऊन खालीं पडतो, त्यावेळेस त्याचे तुषार सर्व जनांवर पसरतात व आपण धारागृहांत आहोंत असा भास होतो. सर्व वृक्षांतून पक्षांचे अव्यक्त मधुर ध्वनि श्रवण तृप्त करीत असतात. ह्याच उद्यानामध्यें गगनाशीं स्पर्धा करणारा असा एक स्तंभ सर्व आरक्त स्फटिकाचाच आहे. ह्याची उंची ७६ फूट आहे व गुरुत्व २४० टन आहे. ज्या पायावर हा उभारला आहे, त्याची उंची १३ फूट आहे. लंडन शहरांतील प्रसिद्ध क्लिओपॅट्रा नांवाची पाषाणशलाका केवळ ७० फूट उंच आहे. हा स्तंभ मिसर देशचे बादशहानें या शहरचे सौंदर्यास भुलून अर्पण केला आहे. या स्तंभावर मिसर देशांतील लिपींत तेथील वृत्तांत लिहिला आहे.

ट्रॉक्याडरो प्यालेस.

हा वाडा उंच जागेवर बांधिला आहे. याचे मध्यभागीं उंच मनोरा आहे; त्याचा घेर ६०० फूट आहे व उंची १८० फूट आहे. त्याच्यावर आणखी दोन मनोरे आहेत; ते प्रत्येक २७० फूट

उंच आहेत. वर जाण्याकरितां एक लीफ्ट ठेविला आहे. वरून सर्व प्यारिस शहरचा देखावा फारच मानी दिसतो.

लक्झेंबर्ग राजवाडा आणि गॅलरी.

हा राजवाडा इ. स. १६१५ त चवथा हेनरी याच्या राणी करितां बांधिला. त्या वेळेपासून राजघराण्यांतील मंडळी १७९१ पर्यंत याच वाड्यांत रहात होती; पुढें जी राजक्रांति झाली त्यावेळीं येथें बंदिवान ठेवीत असत. नंतर १७९९ पासून १८७० पर्यंत राजकीय सल्ला मसलतीच्या सभा भरत असत.* फ्रँको प्रशियन लढाईच्या नंतर १८७९ पासून सीनेट नांवाची मुख्य सभा येथें भरत असते.

या राजवाड्यांतील ग्यालरीमध्यें कुशल कारागिरांनीं काढिलेलीं चित्रें व कोरीव कामाचे नमुने आहेत. त्यांत टयूरकान यानें एक आंधळ्या व पांगळ्याचें चित्र काढलेलें, रॉडीन यानें केलेला सेन्टजॉनचा पंचरशी पुतळा, सूले यानें इफीजिनीया इजवर झालेल्या जुलमाचें चित्र, फ्रँकेश यानें केलेला देवाचा पुतळा व टॉमस यानें केलेला व्हरजीलचा पुतळा, हीं फार सुरेख आहेत. तसेंच क्याबानेलनें काढलेला देखावा, बोगेरोनें काढलेलें तारुण्य व प्रितीचें चित्र, डीटेलीचें १८१५ मध्यें ह्युनीजन किल्यांतून सैन्याचे बाहेर पडणें, हें चित्र, रेपीननें काढिलेलें पावळ्याचें चित्र व यानें ग्यासारट काढलेले दुःखी कुटुंब, झीमनें काढलेला व्हेनीसचा देखावा हीं चित्रें फारच पाहण्यासारखीं आहेत. या राजवाड्यांत एक बाग आहे तोही पाहाण्यासारखा आहे.

आकेरियम.

आकेरियम जलचर प्राण्यांचा संग्रह नेपल्स येथें जितका मोठा आहे, तितका येथें नाहीं; तथापि जो थोडाबहुत संग्रह आहे तो विशेष पहाण्यासारखा आहे.

वरील इमारती पाहून ता० १५ नोव्हेंबर रोजीं सकाळीं ११ वाजतां रा. बा. वणीकर हे ता. १४ रोजीं जिनीव्हा येथून येथें आले होते; ते व आह्मी लंडन येथें जाण्याकरितां निघालों, तें लंडन येथें रात्रीं ८ वाजतां पोचलों.